गुरुवार, १६ मार्च २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक २३६
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस



**पुणे :** राज्यात ऐन उन्हाळ्यात अवकाळी पावसाने हजेरी लावल्यामुळे बळीराजा संकटात सापडला आहे. बुधवारी (दि. १५) दिवसभर राज्यात अनेक ठिकाणी ढगाळ वातावरण होते. सायंकाळी ५ वाजल्यापासून पावसाला सुरुवात झाली. मुंबई, कोल्हापूर, सातारा, नंदुरबार, पुण्यासह अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी याठिकाणी मुसळधार पाऊस झाला. साताऱ्यातील वाई, खंडाळा तालुक्यासह महाबळेश्वरच्या काही भागात पावसाने हजेरी लावली. साताऱ्यातील विद्युत पुरवठा खंडित झाला. पुण्यात सायंकाळी अचानक मुसळधार पावसाला सुरुवात झाली. कोथरूड, डेक्कन, औंध, पुणे विद्यापीठ परिसरात पाऊस झाला. मुंबईतही अनेक ठिकाणी रिमझिम पाऊस झाला.

**अंतरंग**
- देशात जीएसटी संकलनात महाराष्ट्र आघाडीवर/२
- पनवेलमध्ये अत्याधुनिक वाहनांनी होणार सफाई/३
- रजनी गुप्ताची आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड/८



# शेकापसह ‘मविआ’च्या ढोंगीपणाला जनता कंटाळली

## मालमत्ता कराविरोधातील मोर्चानंतर भाजप नेते परेश ठाकूर यांची टीका

**पनवेल : प्रतिनिधी**

**मालमत्ता कराविरोधात पनवेलमध्ये सोमवारी मोर्चा काढून पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांच्या मनामध्ये भाजप व शिवसेनेविरोधात विष कालवण्याचे काम शेकापसह महाविकास आघाडीच्या स्थानिक नेत्यांच्या माध्यमातून होत आहे. या ढोंगीपणाला जनता कंटाळली आहे. वास्तविक पनवेल महापालिकेच्या स्थापनेपासून भाजप सातत्याने सर्वसामान्य जनतेच्या हिताची काळजी करीत आहे. म्हणूनच एकीकडे विकासकामे आणि त्याच वेळेला पनवेलकरांच्या माथ्यावर कराचे ओझे येऊ नये याची भाजपच्या नेतृत्त्वाने सातत्याने काळजी घ्यायचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. आताही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली असलेल्या युतीच्या शिवसेना-भाजप सरकारमुळेच पनवेल महानगरपालिकेला न्याय मिळत असल्याचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.**

महाविकास आघाडीतर्फे मालमत्ताकराबाबत नागरिकांची सातत्याने दिशाभूल करण्यात येत असल्याचा आरोप झाल्यानंतर सत्य परिस्थितीची माहिती देण्यासाठी भारतीय जनता पक्षातर्फे बुधवारी (दि. १५) पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीता पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, अनिल भगत, प्रकाश बिनेदार, मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, अमर पाटील, प्रवीण पाटील, नरेश ठाकूर, बबन मुकादम, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक कीर्ती नवघरे, अमर उपाध्याय उपस्थित होते.

पनवेल महापालिकेची स्थापना झाल्यानंतर पहिले आयुक्त सुधाकर शिंदे यांनी वेळेमध्ये करविषयक प्रक्रिया पूर्ण केली नाही. त्यामुळे एकदम पाच वर्षांचा कर भरण्याची वेळ आली. महापालिकेला जीएसटीचे जे अनुदान आवश्यक होते, त्याबाबतीतही कोणतीच हालचाल न केल्यामुळे अनुदानातही कपात झाली. याबाबत महाविकास आघाडीच्या मोर्चा काढणाऱ्या नेत्यांनी प्रयत्न केले नाहीत. या उलट सत्ताधारी असूनदेखील भाजपने महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये कराचे दर हे ५० टक्क्यांनी कमी करण्यासाठी ठराव दिला होता. **(पान २ वर..)**

### ‘केवळ महापौरपद न मिळाल्यामुळे आगपाखड’

*खारघर कॉलनी फोरमच्या माध्यमातून खोटे आरोप करण्यात येत आहेत. लीना अर्जुन गरड यांना महापौरपद हवे होते व ते न मिळाल्याने त्यांनी टॅक्सला विरोध केला. माझ्यासमोरच अर्जुन गरड यांनी अट ठेवली होती की, लीनाताई गरड यांना महापौरपद द्या अन्यथा आम्ही टॅक्सला विरोध करू. त्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, दबाव आणून राजकीय पदे देता येणार नाही. तुम्हाला जी भूमिका घ्यायची आहे ती घ्या. आम्ही जनतेला सत्य परिस्थिती सांगू असे ठणकावले, असे माजी नगरसेवक किर्ती नवघरे यांनी सांगितले.*

### आत्तापर्यंत झालेली व होणारी विकासकामे

- प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर उभारणी - ६६३ कोटी
- अंतिम टप्प्यात व चालू असलेली कामे - २६३ कोटी
- मलनि:सारण वाहिन्या बसविणे- २०७ कोटी
- १०० टक्के पूर्ण झालेली कामे- १८३ कोटी
- जलकुंभ उभारणी- १४८ कोटी
- एसटीपी प्लांट बसविणे- ५० कोटी
- जलमापक बसविणे- १८ कोटी
- एकूण कामे- १५३२ कोटी

# न्हावा-शिवडी सेतूबाधितांना तातडीने नुकसानभरपाई द्या

## आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांची लक्षवेधी सूचना



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) उभारण्यात येणाऱ्या रायगड जिल्ह्यातील न्हावा-शिवडी सेतू प्रकल्पाच्या बांधकामामुळे न्हावा, गव्हाण, घारापुरी हद्दीतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे व मच्छीमार बांधवांचे पुनर्वसन अद्यापपर्यंत झालेले नाही. याबाबत पनवेलचे कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर व उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी उपस्थित करीत प्रशासनाचे लक्ष वेधले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रायगड जिल्ह्यातील न्हावा-शिवडी सेतू प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे न्हावा, गव्हाण, घारापुरी हद्दीतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे व मच्छीमार बांधवांचे पुनर्वसन अद्यापपर्यंत झालेले नाही. प्राधिकरणाने न्हावा-शिवडी सीलिंक प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छीमार व शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत याद्या तयार करण्यास सांगितले होते. त्यानुसार नऊ याद्या तयार करण्यात आल्या. या यादीतील काही ग्रामस्थांना नुकसानभरपाईच्या रकमेचे वाटप करण्यात आले, मात्र अद्यापही बहुतांश प्रकल्पबाधित शेतकरी व




मच्छीमारांना नुकसानभरपाईच्या रकमेचे वाटप करण्यात आलेले नाही. याबाबत आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी प्रश्न उपस्थित केला.

त्याचप्रमाणे सेतू मार्गामुळे बाधित होणाऱ्या गावांच्या विकासासाठी त्या त्या भागातील ग्रामपंचायतींना प्रत्येकी पाच कोटी विकासनिधी देण्याचे १५ ऑक्टोबर २०२० रोजी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुख्य कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये मान्य करण्यात आले होते, परंतु अद्यापपर्यंत ग्रामपंचायतींना हा निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबत वारंवार प्राधिकरणाला निवेदने देऊनही प्राधिकरणामार्फत कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे शेतकरी व मच्छीमार बांधवांमध्ये नाराजीचा सूर पसरला आहे. मधल्या काळात एमएमआरडीने वेळोवेळी नुकसानभरपाई देण्याचे निकष बदलल्याने या मच्छीमार बांधवांनी सादर केलेले पुरावे ग्राह्य धरले नाहीत व त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले.

नुकसानभरपाईचे वाटप करतानाही एकसूत्रता असणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रशासनाने याबाबत कालबद्ध कार्यक्रम आखावा, तसेच सेतू प्रकल्पबाधित शेतकरी व मच्छीमार बांधवांना तातडीने नुकसानभरपाईचे वाटप करण्याबाबत तसेच प्रकल्पबाधित ग्रामपंचायतींना प्रत्येकी पाच कोटी विकासनिधी देण्याबाबत शासनाने त्वरीत कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी सभागृहात केली. **(पान २ वर..)**

## निवडक


### राज्यात एच३एन२ विषाणूच्या नव्या ३५२ रुग्णांची नोंद

**मुंबई :** राज्यात एच३एन२ विषाणूचा प्रादूर्भाव वाढला असून ३५२ रुग्णांची नोंद झाल्याची माहिती आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी दिली आहे. एच३एन२चा वाढता प्रादूर्भाव लक्षात घेता, रुग्णालयांना अलर्ट राहण्याच्या सूचनाही देण्यात आल्याची माहिती सावंत यांनी दिली आहे. अंगावर आजार काढू नका, खबरदारी घ्या, असे आवाहन आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी केले.

### पुण्यात बेकायदा राहणाऱ्या पाकिस्तानी तरुणाला अटक

**पुणे :** पुण्यात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या पाकिस्तानी तरुणाला विशेष शाखेने पकडले. तरुणाकडून बनावट भारतीय पारपत्र जप्त करण्यात आले आहे. महम्मद अमान अन्सारी (वय २२) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. हा तरुण पुण्यात नेमक्या कोणत्या कारणाने वास्तव्य करीत होता, याचा तपास पोलीस करीत आहेत. त्याने बनावट कागपत्रांद्वारे भारतीय पारपत्र मिळवून बेकायदा वास्तव्य केल्याचे आढळून आले.

# जेजुरी गड पुनर्विकासासाठी १०९ कोटींचा निधी मंजूर



**पुणे : प्रतिनिधी**

जेजुरी गडाचा तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून पुनर्विकास करण्यासाठी राज्य सरकारने १०९ कोटींचा निधी मंजूर केला आहे. येत्या १५ दिवसांत याबाबतचा कार्यादेश निघण्याची शक्यता आहे.

विकास आराखड्याच्या दुसऱ्या टप्प्यात गडपायथा आणि शहराच्या विकासाचे नियोजन करण्यात येत आहे. गडावर पूर्वी सुमारे १५० दीपमाळा होत्या. कालौघात त्या नामशेष झाल्या. त्यातील अधिकाधिक दीपमाळांचे संवर्धनही या पहिल्या टप्प्यात होणार आहे.

मंदिराचे काम मुख्यत्वे दगडांत केलेले आहे. त्यामुळे जीर्ण झालेले दगड बदलण्यात येणार आहेत, तसेच सुस्थितीत असलेल्या दगडांना चमकदार करण्यात येणार आहे. गडावर पूर्वी १५० दीपमाळा असल्याचे निदर्शनास आले आहे. या सर्व दीपमाळा सध्या पुनर्स्थापित करता येणे शक्य नसले, तरी त्यातील अनेक दीपमाळा पुन्हा उभारण्यात येणार आहेत. सध्याच्या दीपमाळांचे संवर्धन दगडांना बदलून चमकदार केले जाणार आहे. हे काम मुख्यत्वे चुन्यात केले जाणार आहे. जेजुरी गडावरील मंदिराच्या विकासाचे, तसेच संवर्धनाचे काम या टप्प्यात होणार आहे.

मंदिराचा गडावरील परिसर १२४० चौरस मीटरचा असून पहिल्या टप्प्यातील कामात मंदिराचे संवर्धन आहे त्या स्थितीत केले जाणार आहे. त्यासाठी १७ कोटी रुपयांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. गडाचे ऐतिहासिक, धार्मिक महत्त्व लक्षात घेता हे काम राज्य पुरातत्त्व विभागामार्फत केले जाणार आहे. याच कामासाठीची दुसरी १८ कोटींची निविदाही लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

## नेरूळमध्ये बांधकाम व्यावसायिकाचा खून

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील नेरूळ येथे एका बिल्डरची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. सावजी पटेल नामक बिल्डरची नेरूळमधील सेक्टर ६मधील रहदारीच्या ठिकाणी दिवसाढवळ्या गोळ्या घालून हत्या करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.

बेलापूर येथे राहणारे सावजी पटेल (वय ५०) इम्पिरीअल बिल्डर्स या नावाने रिअल इस्टेट व्यावसायिक आहेत. नेरूळमधील अंबिका दर्शन सोसायटीत आपल्या (एमएच ४३ बीएन ७४२९) होंडा आय २० गाडीने जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोन जणांनी पटेल यांच्यावर जवळून तीन गोळ्या घातल्या. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. ही हत्या प्रॉपर्टीच्या वादातून झाली असल्याचा प्राथमिक अंदाज क्राईम डीसीपी अमित काळे यांनी वर्तवला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### उद्धव ठाकरेंना आणखी एक धक्का

## माजी मंत्री डॉ. दीपक सावंत यांचा शिवसेनेत प्रवेश



**मुंबई : प्रतिनिधी**

एका बाजूला राज्याच्या विधिमंडळाच्या अधिवेशनामुळे राजकीय वातावरण तापले असताना दुसरीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून उद्धव ठाकरे यांना धक्का दिला जात आहे. उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय समजले जाणारे सुभाष देसाई यांचा मुलगा भूषण देसाई यांचा शिवसेनेत प्रवेश झाल्यानंतर आता ठाकरे यांचे निकटवर्तीय समजले जाणारे माजी मंत्री दीपक सावंत यांनीही बुधवारी (दि. १५) शिवसेनेत प्रवेश केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. डॉ. दीपक सावंत हे राज्याचे माजी आरोग्यमंत्री आहेत. पक्षप्रवेश झाल्यानंतर दीपक सावंत यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर एकत्र काम केले आहे. त्यांच्या कामाचा उरक मला माहित आहे. त्यांच्याबरोबर आरोग्याशी निगडित काम करता येईल, म्हणून मी शिंदे गटात प्रवेश केला, असे डॉ. दीपक सावंत म्हणाले.

# कामोठ्यात रंगला खेळ पैठणीचा

## अर्चना परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन


(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे भाजप आणि संस्कार महिला संस्थेच्या वतीने हळदी कुंकू समारंभ सुषमा पाटील विद्यालयात मंगळवारी (दि. १४) झाला. या समारंभाचे उद्घाटन अर्चना परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कामोठे शहर संस्कार महिला मंडळाच्या अध्यक्षा तथा महापालिकेच्या माजी नगरसेविका कुसूम म्हात्रे यांच्या माध्यामतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महिलांसाठी पैठणीचा खेळ आयोजित करण्यात आला होता. यामध्ये रेखा लिपनाळे या विजयी, तर ललिता धुपलपुडी उपविजेत्या ठरल्या. त्यांना माजी नगरसेविका कुसूम म्हात्रे यांच्या हस्ते पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी भाजप महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा चिटणीस आशा भगत, पनवेल शहराध्यक्षा वर्षा नाईक, उत्तर रायगड भटके विमुक्त आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्षा विद्या तामखेडे, माजी नगरसेविका पुष्पा कुत्तरवडे, डिझाईनर अश्विनी पाटील, कामोठे शहर महिला मोर्चाध्यक्ष वनिता दिलीप पाटील, उपाध्यक्ष साधना आचार्य, रश्मी भारद्वाज, चिटणीस दिपाली तिवारी, खजिनदार नंदा पाटील, फतिमा आलम, ओबिसी सेल अध्यक्षा वनिता पाटील, समाजसेविका हरजंदर कौर, वैशाली घोलप, अनिता शेट्टी, कामोठे सोशल मीडिया सहसंयोजिका तृप्ती चौरे, ७ स्टार पार्लच्या संचालिका शालु चौधरी यांच्यासह कार्यकर्त्या आणि महिला उपस्थित होत्या.

## अलिबागमध्ये बँक कर्मचाऱ्याची निर्घृण हत्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

युनियन बँक ऑफ इंडियाच्या अलिबाग शाखेत शिपाई पदावर काम करणाऱ्या नथुराम पवार यांची निर्घृण हत्या करण्यात आली. अलिबाग तालुक्यातील पाल्हे येथील स्मशानभूमीजवळ त्यांचा मृतदेह आढळला. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अज्ञान व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नथुराम पवार हे १३ मार्चपासून बेपत्ता होते. बँकेत कामावर गेलेले नथुराम घरी परतले नसल्याने त्यांच्या पत्नीने ते बेपत्ता असल्याची फिर्याद अलिबाग पोलीस ठाण्यात नोंदवली होती. ब्राम्हण आळीतील चहाटपरीजवळ त्यांची गाडी पार्क केली असल्याचे आढळून आले होते, तर मंगळवारी (दि. १४) पाल्हे येथे त्यांचा मृतदेह आढळून आला. तिक्ष्ण हत्याराने अनेक वार करून त्यांची हत्या करण्यात आली. याप्रकरणी अज्ञान व्यक्तीविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक शैलेश सणस यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू आहे.

# पनवेल कोनमधील घरांच्या दुरुस्तीसाठी म्हाडाकडून निविदा जारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोन, पनवेल येथील गिरणी कामगारांसाठीच्या दोन हजार ४१७ घरांच्या दुरुस्तीसाठी म्हाडाच्या मुंबई मंडळाने निविदा जारी केली आहे. त्यामुळे आता लवकरच या घरांची दुरुस्ती होणार असून, विजेत्या कामगारांना घरांचा ताबा मिळण्याची शक्यता आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) भाडेतत्त्वावरील गृहप्रकल्पातील कोन, पनवेलमधील दोन हजार ४१७ घरांसाठी २०१६मध्ये सोडत काढण्यात आली होती, मात्र अजूनही विजेत्या कामगारांना घरांचा ताबा मिळालेला नाही. विविध कारणांमुळे घरांचा ताबा रखडला असून अनेक कामगार गृहकर्जाचा समान मासिक हप्ता भरत आहेत. ताबा रखडला असताना म्हाडा आणि एमएमआरडीएमध्ये गेले वर्षभर घरांच्या दुरुस्तीच्या खर्चावरून वाद सुरू आहे. मुंबई मंडळाने कामगारांना घरांचा ताबा लवकरात लवकर देता यावा, यासाठी घरांची दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला आहे.

आता मंडळ स्वतः घरांच्या दुरुस्तीचा खर्च उचलणार आहे, मात्र हा खर्च घरांच्या वितरणातून एमएमआरडीएला मिळणाऱ्या रकमेतून वसूल केला जाणार आहे. या निर्णयानुसार मंडळाने नुकतीच दुरुस्तीसाठी निविदा जारी केली असून बुधवार (दि. १५)पासून निविदा सादर करण्यास सुरुवात होत आहे. ३१ मार्चपर्यंत निविदा सादर करण्याची अंतिम तारीख असून ३ एप्रिलला तांत्रिक निविदा खुल्या केल्या जाणार आहेत. त्यानंतर निविदेची पुढील प्रकिया पूर्ण करून प्रत्यक्ष दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाने दिली.

# देशात जीएसटी संकलनात महाराष्ट्र आघाडीवर

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील एकूण जीएसटी ('वस्तू आणि सेवा करा'चे) संकलनात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. राज्याचा जीएसटी कमी झाला नाही, तर फेब्रुवारी अखेरपर्यंत २०२०-२१ मध्ये ६५,०३८ कोटी रुपये, २०२१-२२मध्ये ८६,४७८ कोटी रुपये, २०२२-२३मध्ये १,१८,०२० कोटी रुपये जीएसटी संकलन महाराष्ट्राने केला आहे. त्यामुळे देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असून गुजरात दुसऱ्या तर कर्नाटक तिसऱ्या क्रमांकावर असल्याचेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी सांगितले.



उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री कृषी सन्मान योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी नमो शेतकरी महासन्मान निधीही योजना जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे केंद्र शासनामार्फत शेतकऱ्यांच्या खात्यावर सहा हजार रुपये जमा केले जातात. राज्य शासनाकडून सहा हजार रुपये प्रति शेतकऱ्याला देण्यात येणार असून यासाठी यावर्षी सहा हजार ९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

केंद्राचे सहा हजार रुपयांवर राज्याचे सहा हजार रुपये, असे आता शेतकऱ्याला १२ हजार रुपये मिळतील. तसेच थेट अनुदानामुळे विदर्भ, मराठवाड्यातील १४ जिल्ह्यांमध्ये केंद्राची शेतकरी सन्मान योजना, राज्याची 'नमो शेतकरी सन्मान योजना' व 'गोपीनाथ मुंडे शेतकरी सानुग्रह योजना' असे मिळून जवळपास २१ हजार रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील. शेतकऱ्यांसाठी एक रुपया भरून प्रधानमंत्री पीक विमा पोर्टलवर नोंदणी करता येणार आहे. या योजनेसाठी अर्थसंकल्पात तीन हजार ३१२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मराठवाडा वॉटर ग्रीडची जबाबदारी केंद्र शासनावर टाकलेली नाही. हर घर जल योजनेंतर्गत मराठवाडा वॉटर ग्रीडचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला असून यासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होणार आहे. विकास दर कोरोनाच्या काळात नकारात्मक झाला होता. उणे १० टक्केवर गेला होता. नंतरच्या काळात तो अचानक वाढला आणि आता तो स्थिरावतो आहे. त्यामुळे विकास दर कमी झालेला नाही. जिल्हा विकास योजनांचा, आदिवासी उपयोजना, असा सर्व खर्च वाढवत नेला. कुठलाही खर्च कमी केला नाही. जिल्हा नियोजन निधी जवळपास ९९ टक्के खर्च होतो. वर्धा, नागपूर, गडचिरोली, भंडारा, अमरावती, अकोला या जिल्ह्यात सरासरी ६० ते ७० टक्के खर्च झाला आहे, असेही या वेळी फडणवीस यांनी सांगितले.

### संप मागे घेण्याचे आवाहन

*राज्य शासन जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या विरोधात नाही. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना आणि जुनी निवृत्तीवेतन योजनेचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी तीन सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. ही समिती तीन महिन्यांत आपला अहवाल सादर करणार आहे. या समितीमध्ये भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी सुबोध कुमार, के. पी. बक्षी, सुधीरकुमार श्रीवास्तव यांचा समावेश आहे. राज्य शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर सुरक्षित, सन्मानजनक व आरोग्यसंपन्न जीवन व्यतीत करता यावे, याकरीता आवश्यक असणाऱ्या सर्व उपाययोजना करण्यात येतील. संपामुळे नागरिकांच्या ज्या काही अत्यावश्यक सेवा असतील त्या सेवांवर परिणाम होऊ नये, आरोग्य विभागातल्या रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी हा संप मागे घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.*

## प्रशासनाच्या संवेदनशीलतेमुळे आदिवासी कुटुंबाला न्याय

### तहसीलदार तळेकरांची कौतुकास्पद कामगिरी





**आदिवासी समाजातील पोकला कुटुंब शेवटपर्यंत ठाम राहिले आणि प्रशासनानेही वस्तूस्थिती जाणून घेऊन सत्याची बाजू समजून घेतली, म्हणूनच हे यश मिळाले.**
**-प्रा. राजेंद्र मढवी,**
उरण सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील मौजे हेदूटने सर्व्हे नंबर १२३/१/ब ही ३२ गुंठे जमीन मिळकत अनंता बाळ्या पोकळा या कुटुंबाच्या नावे आहे. अनंता यांचे आई-वडील अशिक्षित असल्याचा फायदा घेऊन त्यांच्यासोबत सुरेंद्र सिंग आणि त्यांच्या कुटुंबियांनी फसवणूक करून त्या जमीन मिळकतीचे २०११मध्ये अनधिकृतपणे ९९ वर्षांचा भाडे करार केला आणि त्या जागेवर अवैधरित्या कब्जा केला.

आदिवासी जमीन बिगर आदिवासी व्यक्तीच्या नावे होणे अशक्य असल्याचे लक्षात आल्यावर त्यांच्यासाठी काम करणारी एक आदिवासी व्यक्ती हिरामण बुधाजी उघडा यांच्या नावे २०१६मध्ये अवैधरित्या खरेदी-विक्रीचा साठे करार करून फसवणूक करण्याचा दुसऱ्यांदा प्रयत्न करण्यात आला. त्या जागेवर सिंग कुटूंबियांनी त्यांच्या कॉरीवर काम करणाऱ्या लोकांसाठी घरे, गाड्या दुरुस्तीसाठी गॅरेज, गाई, म्हशीचा गोठा देखील बांधला आहे, असा अहवाल स्वतः स्थळ पाहणी आणि सखोल चौकशी करून मंडळ अधिकारी कचरे यांनी सुनावणी दरम्यान सादर केला.

पनवेल ग्रामीण पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तुकाराम कोरडे यांनी देखील नि:पक्षपातीपणे चौकशी करून संबंधितांचा जबाब नोंदविला. पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांनी हा विषय गांभीर्याने घेऊन कागदपत्रांचे व्यवस्थित अवलोकन केले. सिंग कुटूंबीयांचीही बाजू ऐकून घेतली. पुढील तीन महिन्यात सर्व सुनावण्या पूर्ण करून त्या जागेचे हस्तांतरण अवैध असल्याचे स्पष्ट केले. केलेले भाडेकरार तसेच साठेकरार अवैध ठरविले. सिंग यांच्या कुटूंबीयांच्या वतीने बाजू मांडत असलेले वकीलांनी तहसीलदारांचा निर्णय मान्य केला. भूमी अभिलेख अधीक्षक प्रतिनिधी, मंडळ अधिकारी १२ मार्च रोजी त्या जागेवर मोजणी करण्यासाठी गेले आणि त्यांनी पुढील आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली. आदिवासी शेत जमिनीवर असलेली सर्व अवैध बांधकामे तोडून ती जमीन शेतीसाठी आदिवासी कुटुंबाला देण्यात येणार आहे, असे तहसीलदार तळेकर यांनी सांगितले.

## ट्रेलर उलटल्याने एकाचा मृत्यू

**उरण : रामप्रहर वृत्त**

जेएनपीटी ते पळस्पे राष्ट्रीय महामार्गाच्या सेवा मार्ग (सर्व्हिस रस्ता) बाजूने जाणारा कंटेनर ट्रेलर मंगळवारी सायंकाळी ५ वाजता उलटा होऊन रस्त्यालगतच्या टायर पंक्चर दुकानावर कोसळला. यामध्ये दुकानातील टायरचे काम करणाऱ्या व्यक्तीचा वाहनाखाली चिरडल्याने मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

उरण पोलीस आणि रेस्क्यू टीम घटनास्थळी दाखल झाली आहे. सर्व्हिस रस्त्यावरुन जाणाऱ्या ट्रेलर साईड पट्टी सोडून बाजूला उलटल्याने घटना घडली.

## कर्जत फार्मसी महाविद्यालयातील शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात एम.जी.एम. वैद्यकीय महाविद्यालय, कामोठे, उन्नत भारत अभियान आणि इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन, रायगड शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ १५२ रुग्णांनी घेतला.

सरस्वती पूजन व दीप प्रज्वलित करून डॉ. इशान यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन करण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. मोहन काळे, कविता घरत, संतोषी लोखंडे, मानसी कानगोकार, योगेश साखरे, प्रा.निलोफर खान, प्रा. रुपाली येवले, प्रा. तनिष्का ठाकरे प्रा. अनुजा जगदाळे आदी उपस्थित होते.



या वेळी डॉ. काळे यांनी जागतिक महामारीत लोकांना वाचवण्यासाठी डॉक्टर, फार्मासिस्ट व आरोग्य शेत्रातील हे खरे योद्धे आहेत. ते आपल्या शरीराशी संबंधित समस्या बरे करणारे आणि बरे करणारे देवांपैकी एक आहेत, असे मानले जाते. डॉक्टर, फार्मासिस्ट हा अत्यंत निःस्वार्थी आणि इतरांना मदत करण्यासाठी जीवनाचा भक्त असतो, शिवाय तेच एखाद्या व्यक्तीला त्याच्या दुःखातून मुक्त करतात. या आरोग्य तपासणी शिबिराचा मुख्य उद्देश केवळ वैद्यकीय समस्या शोधणे नव्हे तर उन्नत भारत अभियानांतर्गत महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या गावकऱ्यांना समस्या निर्माण होण्यापूर्वी जोखीम घटक आणि आजार ओळखणे हा होता. जेव्हा आपण निरोगी आणि तंदुरुस्त असतो तेव्हा आपण आपल्या जीवनाचा आनंद घेऊ शकतो. शेवटी आपल्या सर्वांना हे माहित आहे की, आपले आरोग्य ही आपल्याजवळ असलेली सर्वात महत्त्वाची संपत्ती आहे, असे स्पष्ट केले.

शिबिरात कम्युनिटी मेडिसिन, मेडिसिन, जनरल सर्जरी, ऑर्थोपेडिक, नेत्ररोग, बालरोग, ओबीजीवाय, त्वचा विभागातील एकूण सात डॉक्टर एक नर्स आणि एक रेडिओलॉजिस्ट सहभागी होते. परिसरातील गावांमधून रुग्ण सल्लामसलत करण्यासाठी आले असून त्यांनी चांगला प्रतिसाद दिला. बीपी, रक्तातील शुगरची पातळी तपासणे, त्वचा, हाडांच्या समस्या, डोळे तपासणी सोबतच औषधांचे मोफत वाटप अशा चाचण्या आणि सल्लामसलत करण्यात आली आहे. डॉ. पूर्वा लखोटिया, डॉ. लव कुशाग्रा, डॉ. पूजा जोशी, डॉ. मयंक पुरोहित, डॉ. अंजली पटेल, सुभान कुरेशी, डॉ. आदित्य मोरे, डॉ. पूर्वा लखोटिया, डॉ. अंजली पटेल आदींनी रुग्णांची तपासणी केली.

## एमआयडीसीने विकलेले सुविधा भूखंड नमुंमपाला परत करावेत

### आमदार गणेश नाईक यांची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या अर्थसंकल्पावरील मागण्यांमध्ये चर्चेत भाग घेताना आज ऐरोली विधानसभा मतदारसंघाचे आमदार लोकनेते गणेश नाईक यांनी उद्योग, ऊर्जा आणि गृह खात्यासंबंधी नवी मुंबईकरांच्या दृष्टीने महत्त्वाच्या मागण्या शासनाकडे केल्या.



नवी मुंबईमधील औद्योगिक वसाहत ही एमआयडीसीची जबाबदारी आहे. स्थानिक प्राधिकरण म्हणून नवी मुंबई महापालिका या भागामध्ये नागरी सुविधा पुरवते. औद्योगिक क्षेत्रामधून काम करणारे लाखो सर्वसामान्य कामगार आणि मजूर या परिसरातील झोपडपट्ट्यांमधून राहतात. नागरी सुविधांसाठी नवी मुंबई महापालिकेने २३३ सुविधा भूखंडांची मागणी एमआयडीसीकडे केलेली आहे. आजतागायत एमआयडीसीने हे सुविधा भूखंड महापालिकेला दिलेले नाहीत. याउलट दिघा, रबाळे, एमआयडीसी आणि पावणे या ठिकाणी मलनिःसारण तसेच अन्य सामाजिक सुविधांसाठी महापालिकेला दिलेले सुविधा भूखंड परस्पर उद्योगपतींना विकले आहेत. याबद्दल संताप व्यक्त करताना एमआयडीसीला शासनाचा धाक राहिलेला नाही असे विधान नाईक यांनी केले.

रिक्षा, टेम्पो, टँकर वाहनतळ इत्यादी सुविधा महापालिकेला एमआयडीसी भागात उपलब्ध कराव्या लागतात. या सुविधांसाठी आवश्यक भूखंडाची मागणी केली असता, एमआयडीसी त्यासाठी महापालिकेकडे पैशाची मागणी करते, याकडेदेखील नाईक यांनी शासनाचे लक्ष वेधले. नवी मुंबई महापालिकेला वितरित केलेले मात्र त्यानंतर उद्योगपतींना विकलेले भूखंड पुनश्च विनाविलंब महापालिकेच्या ताब्यात द्यावेत.

### वीज व्यवस्थेचा दर्जा सुधारा

**नवी मुंबई क्षेत्रातून महावितरण कंपनीला चांगले उत्पन्न मिळते. असे असताना देखील नवी मुंबई पालिका क्षेत्रामध्ये विजेच्या दर्जेदार सुविधा पुरविल्या जात नाहीत. ठिकठिकाणी ट्रान्सफॉर्मर विद्युत केबल, डीपी अशी उपकरणे नादुरुस्त झाली आहेत. वीजपुरवठा अनियमित असतो. या सर्वांचा त्रास नागरिकांना होत असतो. त्यामुळे फडणवीस यांनी महावितरणच्या वरिष्ठांची बैठक बोलवून त्यामध्ये नवी मुंबई शहराला दर्जेदार विजेच्या सुविधा कशा उपलब्ध करून देता येतील यावर कार्यवाही करण्याची विनंती आमदार नाईक यांनी केली.**

### प्रदूषण रोखणे ही एमआयडीसीची जबाबदारी

***नवी मुंबईतील एमआयडीसी भागामध्ये वायू आणि जल प्रदूषण वाढल्याचे दिसते. मानखुर्द डम्पिंग ग्राउंडवर वेळोवेळी लागणाऱ्या आगीचा नवी मुंबईत पसरणारा धूर व अन्य बाबी यास कारणीभूत आहेत. नवी मुंबईतील नागरिकांना श्वसनाचे आजार होत आहेत. याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणावर आळा घालण्याची जबाबदारी प्रदूषण नियंत्रण मंडळाबरोबरच एमआयडीसीवरदेखील आहे.***

## पोलादपूर एस. टी. स्थानकात गाय बसखाली आल्याने ठार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील रायगड जिल्ह्यातील शेवटचे एसटी बस स्थानक असलेले पोलादपूर एसटी बस स्थानक येथे मंगळवारी दुपारी अज्ञात एसटी बसच्या मागील टायरखाली जमिनीवर बसलेल्या गाईचा मृत्यू झाला.

यानंतर तब्बल दुपारी चार वाजेपर्यंत गाईचे पार्थिव पोलादपूर एसटी बसस्थानकाच्या आवारातच पडून होते. त्यामुळे अनेक प्रवासी हळहळत असताना पोलादपूर तालुक्यातील गोरक्षक तरुणांनी तसेच सिस्केप या गिधाड संवर्धन प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांनी गाईचा मृतदेह म्हसळा श्रीवर्धन तालुक्यातील गिधाड संवर्धन क्षेत्रामध्ये खासगी वाहनातून पाठविला.

दरम्यान कोणीही गायीचा मालक त्याच्या गाईचा मृत्यू झाल्याचे अथवा गाय बेपत्ता असल्याचे सांगण्यास पुढे आला नसल्याने तसेच एसटी बस स्थानकातील कोणीही प्रत्यक्षदर्शी गाईचा मृत्यू कोणत्या एसटी बसखाली झाला हे सांगण्यास तयार नसल्याने हा विषय अधिक ताणला गेला नाही.

पान १ वरुन

## शेकाप, मविआच्या ढोंगीपणाला जनता कंटाळली

त्यानंतर प्रशासनाने ३५ टक्क्याला संमती दिली आणि यापेक्षा कराचे दर कमी केले, तर राज्यातल्या अन्य काही महापालिकेप्रमाणे पगारालाही पैसे उरणार नाही अशी चिंता व्यक्त केल्यामुळे सत्ताधारी भाजपला ३५ टक्के कर कपातीवर थांबावे लागले. सिडको वसाहत हद्दीतील नागरिकांना एकाच वेळेला महापालिकेचा कर व सिडकोचा सेवाकर हे दोन्ही भरावे लागू नये म्हणून सत्ताधारी भाजपने ठराव केला आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. दुर्दैवाने महाविकास आघाडीचे सर्व नेते जे कराच्या विरोधात बोंबा मारतात त्यांनी सरकारकडे हे सेवा कर आकारले जाऊ नये म्हणून कोणताही पाठपुरावा केलेला नाही. महापालिकेच्या माध्यमातून आकारला जाणाऱ्या कराबाबत न्याय मिळविण्यासाठी भाजप सातत्याने प्रयत्नशील राहिलेली आहे.

शिंदे-फडणवीस सरकारने महापालिकेच्या मागणी विचार करून जीएसटीचे अनुदान वाढवून दिल्यामुळे एकाच वेळी नागरिकांना भरावा लागणारा चार ते पाच वर्षांच्या करातून किमान दोन वर्षांची तरी सूट मिळावी, अशी मागणी राज्य सरकारकडे भाजपच्या माध्यमातून करण्यात आली आहे. भाजप राज्य सरकारकडे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पाठपुरावा करील. महापालिका स्थापना झाली आणि त्यानंतर या महापालिकेच्या हद्दीमध्ये वेगवेगळ्या पद्धतीच्या विकासकामांना सुरुवात झालेली आहे. पनवेल महापालिका स्थापन झाल्यामुळेच सिडको हद्दीमध्ये बगीचे, मैदाने, हॉकर्स मार्केट, सामाजिक भवन यांसारख्या कामांना सुरुवात झाली व आता पाणीपुरवठा वगळता सर्व सेवांचे हस्तांतरण झाल्यानंतर या सर्व सेवांचा दर्जा सुधारल्याचे पहायला मिळेल.

पूर्वीच्या पनवेल नगर परिषद हद्दीत महापालिका झाल्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, वडाळे तलाव व अन्य अनेक महत्त्वांच्या ठिकाणांचा कायापालट झाला आहे. महापालिका हद्दीतील समावेश झालेल्या समावेश झालेल्या सर्व गावांमध्ये पायाभूत सुविधांच्या कामांना प्रारंभ झाला आहे.

**महानगरपालिका कशासाठी?**

महाविकास आघाडीचे सरकार असताना पनवेल महानगरपालिकेस मिळणारा जीएसटी परतावा प्रति महिना ६.०५ (वार्षिक ७२.०६ कोटी) इतका होता. आता शिंदे-फडणवीस सरकार आल्यावार पनवेल महानगरपालिकेस प्रति महिना ३० ते ३२ कोटी अनुदान सुरू होणार असून त्यापैकी ११३ कोटी महानगरपालिकेच्या खात्यात जमा झाले.

ग्रामपंचायतींमधील शेतकरी कामगार पक्षाचा भ्रष्टाचार बंद झाल्यामुळे पनवेल महानगरपालिका झाल्याची ओरड करीत आहे. पनवेल महानगरपालिका स्थापन झाल्यापासून संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन घंटागाडीद्वारे कचरा उचलणे तसेच धूर फवारणी, औषध फवारणी, अतिक्रमणावर नियंत्रण, अनाधिकृत बॅनरवर कारवाई होत आहे. १५०० कोटींची कामे सरकारी कार्यालयांचे हेलपाटे टाळून करू शकतो.

पनवेल महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या २९ ग्रामपंचायतीचा उपयोग फक्त राजकीय पोळी भाजण्याकरीता होत होता, परंतु आता त्या गावांमध्ये जलकुंभाकरीता १४८.१६ कोटींची कामे व मल:निस्सारण वाहिन्यांकरीता २०७.५८ कोटींची कामे त्याचबरोबर पाच गावांमध्ये (धानसर, कोयनावेळे, सिद्धीकरवले, रोडपाली, रोडपाली आंबेडकर नगर) या गावांमध्ये जवळपास ५० कोटी रक्कमेची स्मार्ट व्हिलेजचे काम अंतिम टप्प्यात आहे.

पूर्वी खारघर, कळंबोली, कामोठे शहरांमध्ये पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्य विकासकामे करू शकत नव्हते, ती कामे पनवेल महानगरपालिकेमार्फत करता येणे शक्य झाले आहे. नागरिकांना सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध झाल्या. मालमत्ता कर कमी करण्यासाठी कायद्यामध्ये आवश्यक तो करावा लागणारा बदलदेखील शिंदे-फडणवीस सरकारकडून करण्यात येईल असा विश्वास आहे.

## न्हावा-शिवडी सेतुबाधितांना त्वरीत भरपाई द्या

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सकारात्मक भूमिका घेत, पनवेल तालुक्यातील गव्हाण व न्हावे या ग्रामपंचायतींना विकासकामांसाठी पाच कोटींचा निधी देण्याचे ठरविण्यात आले होते, मात्र त्याठिकाणी सिडको असल्याने सिडको व प्राधिकरणामार्फत करण्यात येणाऱ्या विकासकामांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी सिडकोला निर्देशित करण्यात आले आहे. या गावांच्या विकासाचा विचार करून भविष्यात या गावांना पाचऐवजी सात कोटींचा निधी दिला जाईल, असे आश्वासन दिले. त्याचप्रमाणे ज्या मच्छीमार बांधवांनी पुरावे सादर केले आहेत, मात्र नजरचुकीने ते दिले गेले नाहीत, अशा मच्छीमारांचे पुरावे पुन्हा तपासले जातील असे सांगितले.


### जाहीर नोटीस

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस**

श्री. सिध्दनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत दहिवडी शाखा-कळंबोली या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरुद्ध थकित कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमुद करुन वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली. तथापि खालील नमुद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असुन सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दि०३/०४/२०२३ रोजी सकाळी ११ :३० वाजता ठेवण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वःता वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित रहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकुन घेतले जाणार नाही.

| दावा क्र | प्रतिवादीचे नाव | पत्ता | थकित कर्ज |
|---|---|---|---|
| ११०/२२-२३ | हरीष मोहनलाल भाटी (कर्जदार)<br>नाथाजी गुलाबराव जाधव (जामिनदार) | मु. पो. कळंबोली ता. पनवेल. जि. रायगड. ४१०२१८<br>मु. पो. महिमानगड ता.माण जि. सातारा ४१५५०८ | २४१०२८ /- |
| १११/२२-२३ | शिवाजी निवृत्ती शेळके (कर्जदार) | मु पो. नांदुर शिंगोटे ता.सिन्नर जि. नाशिक ४२२६०६ | २६५८०६/- |
| ११२/२२-२३ | नाथाजी गुलाबराव जाधव (जामिनदार) (धनाजी पंडीत वलेकर कर्जदार यांचे जामिनदार) | मु. पो. महिमानगड ता.माण जि. सातारा ४१५५०८ | २०९८४७/- |
| ११३/२२-२३ | दिपाली अमोल महाडिक (कर्जदार) | ए.६०२. स्वस्तिकप्लाजा प्लॉट नं. १२.१३.१४. सेक्टर१८. कामोठे. ता. पनवेल .जि.रायगड. ४१०२०६ | १३१८९०/- |
| ११४/२२-२१३ | रामचंद्र निवृत्ती बळीप (जामिनदार)<br>शशिकांत आनंदराव निर्मळ (जामिनदार) (तात्यासो नामदेव देवकर कर्जदार यांचे जामिनदार) | एल. आय. जी२. सेक्टर२ई रूम नंबर बी ६४. कळंबोली . ता. पनवेल. जि. रायगड. ४१०२१८.<br>एल. आय. जी२. सेक्टर२ई रूम नंबर बी ६४. कळंबोली . ता. पनवेल. जि. रायगड. ४१०२१८ | १३७१७१/- |
| ११६/२२-२३ | उमेश मगाराम माळी (कर्जदार) | शॉप नं. १ प्रथमेश पार्क कळंबोली ता. पनवेल. जि. रायगड. ४१०२१८ | २८७८०१/- |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली आहे.
स्थळ- पनवेल
दिनांक- १३/०३/२०२३
जा.क्र. ६७७

शिक्का

**सही/-**
**(भारती काटुळे),**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड**

# पनवेलमध्ये अत्याधुनिक वाहनांनी होणार सफाई

## रिसायकलर सिवर संक्शन कम जेटींग मशिन महापालिकेच्या ताफ्यात

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

महापालिका क्षेत्रातील मलनिःस्सारण वाहिन्यांची दैनंदिन साफसफाई करण्यासाठी १० हजार ५०० लिटर क्षमतेच्या दोन रिसायकलर सिवर संक्शन कम जेटींग मशिन खरेदी करण्यात आल्या आहेत. मलनिस्सारण विभागातील ही सर्वांत अत्याधुनिक वाहने असून या वाहनांमुळे मलनिस्सारण वाहिन्यांची साफसफाई अधिक चांगल्या पध्दतीने करता येणार आहे.

मलनिःस्सारण वाहिन्यांची दैनंदिन साफसफाई करण्यासाठी १०,५०० लिटर क्षमतेच्या दोन रिसायकलर सिवर संक्शन कम जेटींग मशिन महापालिकेने खरेदी केल्या आहेत. ही वाहने १५० ते १२०० मी.मी. व्यासाच्या मलवाहिन्यांमध्ये असलेला अडकलेला गाळ (चोकअप) काढण्यास सक्षम आहेत. या वाहनांमध्ये हायड्रॉलिक व्हॅक्यूम आणि हाय प्रेशर-हाय फ्लो वॉटर जेटिंग पंप व सुरक्षितता इत्यादी बाबी अंतर्भुत आहेत.




हायड्रोडायनामिक क्लोनिंगच्या तत्त्वावर काम करणाऱ्या व हाय प्रेशर जेटिंग सिस्टीमद्वारे सीवर आणि ड्रेनजच्या पाण्याच्या लाईन्स आणि चेंबर्सचे डी-चॉकिंग आणि डी-सिल्टिंग योग्य प्रमाणात करणे, सीवर जेटिंग पाईप आणि विशेष नोजलने साफ करण्याची क्षमता या वाहनांमध्ये आहे.

खराब पाण्यांवर पुर्नप्रक्रिया (रिसायकल) करण्याची व्यवस्था या वाहनांमध्ये अंर्तभूत आहे. यामुळे साफसफाईतून जमा होणारे पाणी पुन्हा वापरात येणार आहे. त्यामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होणार असल्याची माहिती उपायुक्त सचिन पवार यांनी दिली आहे. मलनिस्सारण विभागातील सर्वांत अत्याधुनिकअशी ही रिसायकलर सिवर संक्शन कम जेटींग ही मशिन आहे. ही मशीन उपलब्ध झाल्याने मलनिस्सारण वाहिन्या साफसफाई करण्याकरीता महापालिकेकडे सक्षम पर्याय उपलब्ध होणार आहे. सिडको प्रशासनाकडून मलनिस्सारण वाहिन्यांचे हस्तांतरण झाल्यांनंतर महापालिकेने नागरिकांचे आरोग्य सदृढ राहण्याकरिता ही वाहने घेऊन महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.

### अशी आहे वाहनांची क्षमता

*सांडपाण्याच्या विशिष्ट गुरुत्वाकर्षणावर अवलंबून व्हॅक्यूम तयार करून अंदाजे सहा ते आठ मीटरच्या चेंबर सांडपाणी, द्रव स्लरी, गाळ आणि इतर साहित्य बाहेर काढण्याची क्षमता या वाहनांमध्ये आहे. या वाहनाच्या टाकीतील जमा झालेल्या गाळाची विल्हेवाट इच्छित स्थळी नेऊन गुरुत्वाकर्षण, प्रेशर डिस्चार्जद्वारे रिकामी केली जाणार आहे.*

# चिरनेरमधील डोंगर आगीच्या भक्षस्थानी

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यात वारंवार लागत असलेल्या वनव्यांमुळे मोठ्या प्रमाणात वनसंपदेला धोका पोहचत असताना गेल्या दोन-तीन दिवसांपूर्वी पुन्हा एकदा चिरनेर पूर्व भागातील उंच डोंगरांना वनवा लागल्याने ही वनव्याची आग दोन-तीन दिवस जळताना चिरनेर गावातून दिसत आहे. रात्रीच्या काळोखात तर ही भडकलेली आग येथील नागरिकांना स्पष्ट दिसत होती.

दरम्यान, या चिरनेर पूर्व भागातील उंच डोंगरांना आगी लागण्याचे प्रकार हे गेली कित्येक वर्षापासून घडत आहेत. परिणामी या आगीत झाडे, झुडपे ,पशुपक्षी तसेच सूक्ष्मजी व सरपटणारे प्राणी यांच जळुन मृत्यू होऊन सजीव सृष्टी व त्याचा विपरीत परिणाम होताना नजरेत दिसत आहे. ही वणव्याची आग हिरवीगार वनसंपदा नष्ट करीत असताना या वणव्यांवर नियंत्रण आणणे अत्यंत गरजेचे आहे.

वनविभागाने ही बाब गंभीरतेने घेऊन तत्काळ उपायोजना करणे आवश्यक आहे. कारण जंगल भागात राहणारे ससा, भेकर, रानडुक्कर तसेच अन्य पशु पक्षांची अन्न पाण्यासाठी खूप वाताहात होत असते. या सर्व पशुपक्षांना अन्न पाहण्यासाठी दाही दिशा भटकावे लागत आहे. या ठिकाणी वनवे लागणार नाहीत याची खबरदारी सर्वांनीच घेतली पाहिजे.

दरम्यान सोमवारी येथील शेतकरी वसंत ठाकूर, अशोक ठाकूर, दिलीप ठाकूर यांच्या आंबा बागेला आग लागल्याने त्यांच्या आंबा बागेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यात बागेत असणारी बांबूची बेटे, आंब्याची झाडे व हापूसची कलमे साग व शीवन यासारखी महत्त्वाची उपयुक्त उत्पादन देणारी झाडे या आगीच्या भक्षस्थानी आली. कैऱ्या व मोहर या आगीच्या भक्षस्थानी येऊन पडल्या. ही आग लावली गेली असल्याचे या बागायतदारांनी सांगितले.

# शाळेजवळील पान टपरी त्वरीत बंद करा

## माजी नगरसेविका नेत्रा पाटील यांची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्याजवळ असलेली पान टपरी त्वरित बंद करण्यात यावी, अशी मागणी पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी प्रभाग अधिकारी अ प्रभाग समिती, खारघर तसेच खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.



नेत्रा पाटील यांनी निवेदना म्हटले की, खारघर शहरातील त्यांच्या प्रभागातील सेक्टर १९ मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल समोरील कॉर्नर जवळ प्लॉट नंबर ५५ सेक्टर २० येथे व्हाईट हाऊस नावाचे एक गेस्ट हाऊस आहे त्याठिकाणी एक पान टपरी असून त्या पान टपरीतून मोठ्या प्रमाणात तरुण-तरुणी हे गुटखा, पान तंबाखू व सिगरेट अशा पदार्थांचे सेवन करताना आढळतात. या ठिकाणी सिगारेट व इतर धुम्रपान करण्यासाठी मोठ्या प्रमाणात रात्रीचे तरुण-तरुणी जमतात त्यांनी केलेल्या धूम्रपानामुळे व नशेमुळे ते बेभान होऊन अश्लील चाळे करतात परिसरातील रहिवाशांना या ठिकाणी राहणे मुश्किल झाले आहे. त्या ठिकाणी निर्लज्जपणाचा कळस हे तरुण-तरुणी करतांना दिसून येतात. यामुळे बाजूलाच असणाऱ्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या बालमनावर परिणाम होतील.

ठिकाणी मद्यधुंद अवस्थेत तरुण-तरुणी धूम्रपान व नशा करण्यासाठी येत असल्याची तक्रार त्या ठिकाणी राहणाऱ्या रहिवाशांनी खारघर पोलीस ठाण्यामध्ये १५ फेब्रुवारी २०२३ रोजी एनसीआर दाखल करून केलेली आहे. माझ्याकडेदेखील अशा प्रकारची तक्रार करण्यात आलेल्या आहेत. नशा केल्यानंतर त्यांचे मानसिक संतुलन सुटत असून ते त्या ठिकाणी अश्लील चाळे करणे, मोठ्या प्रमाणात कर्ण-कर्कश आवाज करणे, धूम स्टाईल बाईक (मोटरसायकल) चालवणे असे प्रकार करत असतात.

ही पान टपरी त्वरित बंद करण्यात यावी, अन्यथा भविष्यात दुर्घटना झाल्यास त्यास पूर्णतः व्यावसायिक जबाबदार राहील याची नोंद प्रशासनाने घ्यावी. पान टपरी बंद न झाल्यास रहिवाशांसोबत आंदोलन करावे लागेल याची आपण नोंद घ्यावी, असे नेत्रा पाटील यांनी निवेदनात नमुद केले आहे. यासोबतच या पत्रासोबत रहिवाश्यांच्या सह्या असलेले पत्रक जोडले आहे.

# बालई काळाधोंडा गावठाण मोजणीचे उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील बालई काळाधोंडा येथील घरांच्या गावठाण मोजणीसंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आदेश दिले आहेत. त्यामुळे उरण, बालई, चाणजे विभागातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.



सिडकोने उरणच्या चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील ८०० एकर मधील हजारो घरे तोडण्याचे आदेश दिले होते. घराखालील जमिनी आमच्या आहेत, असे सिडको अधिकारी सांगत होते. प्रत्यक्षात १९७० आणि त्याअगोदर नैसर्गिक लोकसंख्येच्या वाढीनुसार वाढलेली घरे आणि त्यांच्या नोंदी तहसीलदार आणि भूमी अभिलेख विभाग घेत नव्हती. १९७०पासून सिडको भूसंपादनाची नोटीस आल्यापासून मूळ गावठाणे आणि त्याच्या पुढे वाढलेली गावठाण हद्द निश्चित करणे हे जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार आणि भूमी अभिलेख यांचे शासकीय कर्तव्य आहे. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकेच्या सुनावणीत जिल्हाधिकारी यांनी महसूल विभागाच्या ऐतिहासिक चुकांपैकी गावठाण विस्ताराची केलेली ही चूक जाहीरपणे मान्य केली होती.

या कामी प्रत्येक गावाने गावकमिटी तयार करून लोकवर्गणी काढून आपले गाव मोजणे हे गावकरी नागरिकांचे कर्तव्य ठरते.याविषयी प्रबोधन आणि जागृतीचे काम मुंबई, नवी मुंबई, पनवेल उरण रायगड या भागात सातत्याने सुरू आहे. महामुंबईतील क्षेत्रात विकासामुळे मूळ गावकरी आगरी, कोळी, कराडी, भंडारी ईस्ट इंडियन आदिवासी, एससी, एसटी या भूमिहीन, घरहीन लोकांच्या घरावर नेहमीच सरकारी बुलडोझर चालविले जात आहेत. हा देशातील मोठा अन्याय आहे. बालई काळाधोंडा ग्रामविकास परिषदेतील गावकमिटी आणि गावकऱ्यांनी लोकवर्गणी काढून आपले १२२ एकरचे विस्तारीत गावठाण मोजले आहे.

गावातील एकूण लोकसंख्या २६९७ आहे. तसेच घरांची संख्या ११११ एवढी आहे. या माहितीसह सातत्यपूर्ण पत्रव्यवहाराची दखल घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र राज्याचे जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख कार्यालय महाराष्ट्र राज्य पुणे यांना आदेश देऊन गावठाण चळवळीस गतिमान केले आहे. परिषदेचे सचिव रवींद्र चव्हाण यांनी महसूल व वन विभाग मंत्रालय यांना पाठविलेल्या माहिती अधिकारात ही माहिती मिळाली आहे.

उरण बालई चाणजे विभागातील गावठाणे घरे यांच्या प्रॉपर्टी कार्ड मागणीवर लोकवर्गणी काढून काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांच्या उत्साहात आनंदाची भर पडली आहे.





**पनवेल : आमदार महेश बालदी यांच्या निधीमधून कराडे खुर्द गावातील अंतर्गत रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले. या कामाच्या पाहणीवेळी कराडे खूर्द माजी सरपंच विजय मुरकुटे, माजी उपसरपंच यशश्री मुरकुटे, योगेश मुरकुटे, राजेश कारंडे, नलिनी कारंदे, जनार्दन महाडिक, बंडू मोडक, दिनेश कारंदे, प्रकाश मुळे आदी उपस्थित होते.**

# पनवेल महापालिकेच्या महिला मुकादमांचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

जागृती फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा पनवेल युवाचे संपादक निलेश सोनावणे यांच्या संकल्पनेतून पनवेल महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या मुकादम म्हणून गेली अनेक वर्षे सेवा करणाऱ्या, वर्षांतील ३६५ दिवस पनवेल शहर स्वछ ठेवण्याचे काम करणाऱ्या महिलांचा स्वच्छता देवदूत म्हणून सन्मान करण्यात आला.

या वेळी पनवेल युवाचे संपादक निलेश सोनावणे यांनी सन्मान करण्याचा उद्देश मनोगतातून सांगितला. या वेळी ज्येष्ठ पत्रकार पनवेल टाइम्सचे संपादक गणेश कोळी, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, महानगरचे प्रतिनिधी समीर वैश्विकर, जागृती फाऊंडेशनचे तळोजा विभागीय अध्यक्ष कल्पेश कांबळे, कामगार नेते शरद कांबळे, सतीश चिंडालीय आदी उपस्थित होते.



अनेक वर्षे शहराची सेवा करणाऱ्या, शहर स्वच्छ सुंदर ठेवण्याचे काम करणाऱ्या सफाई कर्मचारी ते मुकादम असा प्रवास असलेल्या पनवेल महापालिकेच्या महिला मुकादम म्हणून काम करणाऱ्या ममता टाक, भारती शेलार, मीना चरण, रंजना चव्हाण, अरुणा जाधव, गुलाब हरवंडकर, छाया चित्ते या महिलांचा सन्मान जागृती फाऊंडेशन आणि पनवेल युवाच्या वतीने करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पनवेलमधील द्वारकादास साडी आणि द्वारकाधीश साडी यांनी सहकार्य केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात व्यवसाय नियोजन स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि. १५) अकाउंट व फायनान्स विभागातर्फे महाविद्यालयातील व्यावसायिक शाखेमधील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी व्यवसाय नियोजन स्पर्धा आयोजित केली होती.



या स्पर्धेमध्ये सुमारे ३९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन चांगल्या पद्धतीने व्यावसायिक नियोजनाबद्दल उत्कृष्टपणे सादरीकरण केले. या व्यवसाय नियोजन स्पर्धेमध्ये अकाउंट व फायनान्स विभागातील द्वितीय वर्षाचा विद्यार्थी सतेंद कुशवाह या याने प्रथम क्रमांक पटकाविला तसेच प्रथम वर्षातील सुजल रोहीलकर व स्वजल चवळकर या दोघांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. ही स्पर्धा घेण्यामागचा प्रमुख उद्देश व्यवसाय विभागातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना भविष्यामध्ये स्वतःच्या व्यवसायाचे नियोजन करता यावे तसेच वेगवेगळ्या व्यवसायाचे ज्ञान अवगत व्हावे व स्वतःच्या व्यवसायाचे चांगल्या पद्धतीने सादरीकरण करणे हे होते.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी वाणिज्य शाखेतील या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी व्यावसायिक नियोजन कशा पद्धतीने करायचे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व व्यावसायिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रवर शर्मा (अकाउंट व फायनान्स विभागाचे प्रमुख) यांनी केले व प्रा. तनुजा सुमन, प्रा. योगिता पाटील व प्रा. मौसमी लांबे यांनी सहकार्य केले.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्राध्यापक विशाल देशमुख हे उपस्थित होते.

# ‘रोटरी’तर्फे मोहोपाडा येथे स्वच्छता मोहीम

**रसायनी : प्रतिनिधी**

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१चे प्रांतपाल डॉ. अनिल परमार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बुधवारी (दि. १५) रोटरी व रोट्रॅक्ट क्लब ऑफ पाताळगंगा तर्फे सेबी NISM रोड मोहोपाडाजवळ स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या वेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष अमित शाह, क्लब सेक्रेटरी डॉ. धीरज जैन, सहाय्यक सेक्रेटरी विजय पाटील, खजिनदार देवेंद्र, माजी अध्यक्ष गणेश काळे, शशिकांत शानबाग, डॉ. लेखा उचिल, एनजल सुंदर व रोट्रॅक्ट प्रेसिडेंट समृद्ध उचिल, सेक्रेटरी नेहा मरीअम व अन्य रोट्रॅक्टर्स उपस्थित होते. सकाळी वॉकला येणाऱ्या नागरिकांनी रोटरीच्या या उपक्रमाचे कौतुक केले.



(छाया : बी. एस. कुलकर्णी)

# लिमये वाचनालयात महिला दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रातील महिला महाराष्ट्र पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अधिकाऱ्यांच्या पत्नी व पनवेल बार असोसिएशन कमिटी मधल्या महिलांचा सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्षा ॲड. सुनिता श्रीकांत जोशी यांनी केले. सत्कार मूर्तींचा परिचय ॲड. माधुरी थळकर यांनी करून दिला. सहायक पोलीस निरीक्षक वृषाली पवार, सहायक पोलीस निरीक्षक अंबिका अंधारे, सहायक पोलीस निरीक्षकधनश्री पवार, पोलीस उपनिरीक्षक यांची पत्नी पायल खाडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या पत्नी प्रिया तुकाराम कोरडे, पनवेल बार असोसिएशन कमिटी मधल्या महिला ॲड. सीमा भोईर, ॲड. प्रगती माळी, ॲड. छाया म्हात्रे यांचा ही सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे या सर्व महिलांचा सत्कार पुरुषवर्गाने केला. त्यानंतर वृषाली पवार यांनी त्यांचे अनुभव व्यक्त केले. तसेच स्वातंत्र्य आणि स्वैराचार यांचे भान महिलांनी ठेवले पाहिजे म्हणजे गुन्ह्यांना आळा बसेल असे सांगितले. तसेच के. गो. लिमये वाचनालयातील कर्मचारीआणि उपस्थित सर्व महिलांचेही पुष्प देऊन स्वागत केले. या कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष श्याम वालावलकर, कार्यवाह काशिनाथ जाधव, कार्यकारिणी सदस्य रमेश चव्हाण, सुनील खेडेकर, हिमालिनी कुलकर्णी, हेमा गद्रे, प्रशांत राजे तसेच मोठ्या संख्येने महिला व पुरुष वर्ग उपस्थित होता.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल निकेता शिंदे, संपदा जोशी, नंदिनी मंडराई, संजय दिवटे यांनी मेहनत घेतली. उपस्थितांचे आभार सहकार्यवाह जयश्री शेट्येयांनी मानले. अल्पोपहारानंतर या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाची सांगता झाली.

## संपादकीय

# दिवाळखोरीचे राजकारण

ठाकरे सरकारनेही आपल्या कार्यकाळात जुन्या पेन्शनचा मुद्दा दूरच ठेवला होता हे सर्वज्ञात आहे. असे असूनही केवळ राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी आता उद्धव ठाकरे जुन्या पेन्शनच्या मुद्द्याला पाठिंबा देत सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपाला बळ देतात हे आश्चर्यकारक आहे.

**राज्यकारभार चांगला चालवण्यासाठी सत्ताधारी कर्तृत्ववान आणि शुद्ध हेतूने काम करणारा असावा लागतो, तसाच विरोधी पक्षदेखील जनतेचे प्रश्न पोटतिडिकेने मांडणारा असावा लागतो. किंबहुना, राज्यकर्त्यांना सरळ मार्गावर ठेवण्याची जबाबदारी विरोधीपक्षावरच जास्त असते. सोप्या भाषेत सांगायचे तर कारभाराचा गाडा राज्यकर्ते चालवत असले तरी चाबूक मात्र विरोधीपक्षाच्या हातात असावा लागतो, परंतु हातात चाबूक आहे म्हणून बैलांच्या पाठीवर वेडेवाकडे तडाखे मारणे हे गाडीवानाचे शहाणपणाचे लक्षण मानता येणार नाही. दुर्दैवाने महाराष्ट्रातील विरोधी पक्ष अक्षरश: दृष्टिहीन झाला आहे असे म्हणावे लागते. अचानक सत्तेची खुर्ची गेल्यानंतर सैरभैर झालेले महाविकास आघाडीचे नेते वाट्टेल ते आणि वाट्टेल तसे बरळताना दिसतात. त्यांच्या टीकेला ना अभ्यासाची धार, ना शुद्ध जनताभिमुख दृष्टिकोन. सत्तेपासून वंचित झालेले हे नेते भारतीय जनता पक्षाला सत्तेवरून खाली खेचण्याची भलभलती स्वप्ने पाहू लागले आहेत. महाविकास आघाडीतील काही नेते बेताल बडबडत असले तरी आघाडीचे मोजके नेते जपून टीका करताना दिसतात. त्यांनी केलेली टीका सकारात्मकरितीने स्वीकारलीदेखील जाते. उदाहरणार्थ विरोधीपक्ष नेते अजित पवार यांचेच नाव घ्यावे लागेल. त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे सत्ताधाऱ्यांकडून गांभीर्याने घेतले जातात हे अनेकदा बघायला मिळाले आहे. तथापि, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबद्दल काय बोलावे? सध्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या जुन्या पेन्शनचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. २००५ साली केंद्रातील वाजपेयी सरकारने जुनी पेन्शन बंद करून नव्या पेन्शनचे धोरण आणले होते. तो निर्णय इतका अचूक होता की नंतर सत्तेवर आलेल्या पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनीदेखील तो कायम ठेवला. डॉ. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञही असल्याने जुन्या पेन्शनमुळे सरकारी तिजोरीवर भविष्यात अपरंपार बोजा वाढेल हे त्यांनी ओळखले होते. आता पंधरा वर्षांनंतर पुन्हा एकदा जुन्या पेन्शनची मागणी होत आहे. निवृत्तीनंतर सरकारी कर्मचाऱ्यांना शांत चित्ताने जगता यावे ही इच्छा प्रत्येकाच्याच मनात आहे. कुणीही सरकारी कर्मचाऱ्यांचा दुस्वास करत नाही. जुन्या पेन्शनचे धोरण पुन्हा राबवले तर २०३० सालानंतर राज्याच्या तिजोरीवर इतका ताण येईल की त्यामुळे अर्थव्यवस्थेचे कंबरडेच मोडेल. सरकारी तिजोरीत जमा झालेल्या महसुलापैकी मोठा भाग कर्मचाऱ्यांच्या पगार, भत्ता आणि निवृत्ती वेतनावरच खर्च करावा लागेल. हा सारा हिशेब अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने विधिमंडळाच्या सभागृहात मांडला होता. अशाच प्रकारचे विचार महाविकास आघाडीच्या सरकारमधील अर्थमंत्री अजित पवार यांनीही तेव्हा मांडला होता हे लक्षात घेतले पाहिजे. उद्धव ठाकरे यांनी आता कर्मचारी संपाला बळ देणे ही वैचारिक दिवाळखोरी म्हणायचे की राजकीय स्वार्थ हे आता ज्याचे त्याने ठरवावे. माजी मुख्यमंत्री ठाकरे यांना अर्थशास्त्रातले काही कळत नाही आणि त्यात त्यांना रसदेखील नाही हे त्यांनीच एका कार्यक्रमात केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांच्यासमोर सांगून टाकले होते. जुन्या पेन्शनच्या संदर्भात त्यांनी अर्थशास्त्राचा प्राथमिक अभ्यास तरी करावा एवढीच अपेक्षा.**

# पोलादपूरातील महादेव कोळी समाज उपेक्षित




**खबरबात**
**शैलेश पालकर**

ऐतिहासिक आणि शिवकालीन महत्त्व असलेल्या पोलादपूर तालुक्याचे जात आणि व्यवसायदृष्ट्या फारच कमी भेद आढळून येत आहेत. यामध्ये मराठा, कुणबी आणि महादेव कोळी या तीन जातींची व्याप्ती लक्षणीय असून या तीनही जातींमध्ये रोटी-बेटी व्यवहार पुर्वापार सुरू आहेत. अलिकडे, आरक्षणाच्या मुद्द्यांवरून मराठा अग्रेसर आहेत तर कुणबी इतर मागासवर्गीय म्हणून आरक्षणाच्या प्रतिक्षेत आहेत. या उप्पर महादेव कोळी समाज अजूनही आरक्षण मिळेल अथवा नाही यापेक्षाही जातीचा आणि जातपडताळणीचा दाखला मिळेल अथवा कसे, या विवंचनेमध्ये दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यातील महादेव कोळी समाजबांधवांपैकी काहींना १९८० पूर्वी तहसीलदारांकडून जातीचे दाखले मिळाले आहेत. मात्र, त्यानंतर आता नव्याने प्रांताधिकारी कार्यालयामार्फत जातीचे दाखले मिळत नसल्याने तालुक्यातील २१ गावांमध्ये विखुरलेला हा मागास समाज अद्याप जातीच्या दाखल्यांपासून वंचित राहिला असल्याची खळबळजनक बाब उघडकीस आली आहे.

पोलादपूर तालुक्यातील करंजे येथील काही महादेव कोळी समाजाच्या लोकांना १९८० पूर्वी पोलादपूर तहसिलदार तथा एक्झिक्युटीव्ह मॅजिस्ट्रेट यांच्या सहीशिक्क्यानिशी जातीचे दाखले देण्यात आले आहेत. यासंदर्भात पूर्वी कुलाबा जिल्हाधिकारी यांनी ३ जून १९६७ रोजी कुलाबा जिल्ह्यातील कर्जत, खालापूर, अलिबाग, महाड व सुधागड या तालुक्यांतील महादेव कोळी व डोंगर कोळी यांनाच अनुसुचित जमात म्हणून मान्यता दिल्याचे निर्देश देताना इतर तालुक्यातील लोकांस तशी मान्यता मिळालेली नसल्याचे सूचित करणारे पत्र पेण तहसीलदारांना उद्देश्यून असून या पत्राची प्रत तजविजीसाठी महालकरी पोलादपूर यांना माहितीसाठी पाठविली आहे. हे निर्देश राज्य सरकारच्या शिक्षण आणि समाजकल्याण विभागाच्या ११०१९६२ च्या परिपत्रकानुसार तसेच समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा आणि पर्यटन विभागाच्या २९३१९७२च्या परिपत्रकानुसार जातीचे दाखले देण्यासंदर्भात कायम असल्याचा उल्लेख असलेल्या परिपत्रकांच्या आधारे देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

यासंदर्भात म्हसळा पंचायत समितीचे तत्कालीन उपसभापती एस. डी. शिंदे यांना राज्यसरकारच्या याच समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा आणि पर्यटन विभागामार्फत केंद्रशासनाच्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती सुधारणा कायदा १९७६ अन्वये २७ जुलै १९७७ पासून महादेव कोळी किंवा डोंगर कोळी संबंधातील क्षेत्रबंधन दूर करण्यात आल्यानुसार म्हसळा व श्रीवर्धन तालुक्यातील या जमातीचे लोक अनुसूचित जमातीचे म्हणून मानले जातील, या संबंधात सर्व अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्याचे १४ डिसेंबर १९७८च्या पत्रान्वये कळविण्यात आले असल्याचा संदर्भ आढळून आला आहे.

आदिवासी विकास मंत्रालयाने १४ जानेवारी १९९९च्या परिपत्रकानुसार अनुसुचित जमातीतील 'कोळी महादेव' या जमातीला जातीचे दाखले देण्याबाबतचा खुलासा तयार केला असून यानुसार क्षेत्रबंधने उठविण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यामध्ये अनुसूचित जमातीच्या कुटूंबांना ते शहरात अथवा मूळ गावापासून दूर राहू लागल्याने जमातीच्या चालीरिती, व्रतवैकल्ये, सण इत्यादींची माहिती नसल्याने या कारणास्तव त्यांना अग्राह्य ठरविणे चुकीचे होईल, असे स्पष्ट करताना अर्जदारांचे अर्ज का नाकारले याची कारणे व दिलेला प्रत्येक पुरावा अग्राह्य का वाटतो याबद्दलही आदेशात नोंद नमूद करायचे आदेश सक्षम अधिकाऱ्यांना दिले आहेत.

पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथील सरपंचपदावरील रमेश नारायण गायकवाड यांना या समाजाचे असूनही जातपडताळणीवेळी अपात्र ठरविले गेल्याने २००९ साली अडीच वर्षाचा कालावधी संपल्यानंतर पायउतार व्हावे लागले होते तर अलिकडेच या समाजाच्या दाभिळ येथील एका तरूणाला महादेव कोळी अनुसूचित जमातीचा दाखला जातपडताळणीवेळी ग्राह्य झाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नोकरीची संधी मिळाली आहे, मात्र या दोन घटना परस्परविरोधी असूनही एकाच समाजासंदर्भात आहेत. यामुळे सक्षम अधिकारीदेखील महादेव कोळी या अनुसूचित जमातीबाबत जातीचा दाखला देण्याबाबतचा अर्जही स्विकारताना अनुत्सुक असल्याचे दिसून येत आहे. परिणामी, अर्ज स्विकारलाच गेला नाही तर कोणत्या कारणास्तव नाकारला, यासंदर्भातील मत व्यक्त करण्याच्या कचाट्यातून या अधिकाऱ्यांना सुटता येत आहे. परिणामी, पोलादपूर तालुक्यातील सुमारे उमरठ, दाभिळ, करंजे अशा सुमारे २१ गावांतील महादेव कोळी समाजबांधवांना जातीचे दाखले मिळत नाहीत.

कोकणातील मुरा म्हणजे उंचावरील सपाटप्रदेश असलेला भूभाग. याठिकाणी अतिशय पुरातन असे महादेवाचे मंदिर असल्याने या गावाला महादेवाचा मुरा हे असे नाव पडले आहे. हे गाव बोरघर आणि गोवले या दोन ग्रामपंचायतींमध्ये विभागले गेले आहे. या गावातील समोरासमोरील ४० घरांच्या रांगा अशा प्रकारे दोन वेगवेगळ्या ग्रामपंचायतींमध्ये विभागल्याने या गावाला महसुली गावाचाही दर्जा मिळाला नाही. ब्रिटीश काळात या लोकवस्तीचा उल्लेख आदिवासी पाडा असा करण्यात आल्याचे दिसून येत आहे. एका बाजूला महाबळेश्वरचा ऑर्थर सीट पॉईंट, दुसऱ्या बाजूला कांगोरीगड आणि समोरच चंद्रगड तर नजरेच्या टापूत शिवछत्रपतींनी रूधीर तिलक लावून हिंदवी स्वराज्याची प्रतिज्ञा घेतलेला रायरेश्वर मंदिराचा पाडाही दिसून येतो. काश्मीरमधील पहेलगामप्रमाणे बशीसारख्या या खोलगट भुभागात स्वच्छ सुर्यप्रकाश असताना सर्वच इतिहास अगदी साद घालताना दिसून येतो.


उन्हाळ्यात तब्बल दोन-अडीच किमी पायपीट करून पाणी आणणाऱ्या महिलांचा संसार अद्याप चुली कुंफ्कूनच चालला आहे. या गावाकडे गोवेले गावाकडून असलेला रस्ता सर्वात जवळचा रस्ता असल्याने तो २००९ साली करण्यात आला. या वेळी रस्त्यामुळे पाणीटंचाईकाळात येणाऱ्या पिकअपजीपची वाट पाहणारे आबालवृध्द सुखावले जात असत. अंगणवाडी, प्राथमिक शाळा येथून शिकलेली मुलं साखर आणि उमरठ येथील माध्यमिक शाळांमध्येही जात आता महाबळेश्वर, पाचगणी यासारख्या ठिकाणी नोकरीनिमित्त गेली आहेत. या पाड्यावरील पारधी, सावंत, बुडले, कदम, झुंजार, वाघमारे, कोलपे, धानावले, टेकावले आदी आडनावाचे ग्रामस्थ पूर्वापार महादेव कोळी समाजाचे असूनही नोकरी उपजिविकेसाठी अन्यत्र स्थलांतरीत झाल्याने त्यांच्याकडे महादेव कोळी आदिवासी समाजाचे जातीचे दाखलेही नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे आदिवासींप्रमाणे या लोकवस्तीला रेशन धान्याचेही वाटप होत नाही. स्थानिक उपजिविका चक्क जंगलातील फळे विशेषत आंबे, फणस, काजू, बोरं, मध, वनौषधी विकून चालत आहे. या पाड्यावरील सर्वाधिक वयोवृध्द महिला ९८ वर्षांची असून दात आणि आवाज शाबूत असलेली ठणठणीत प्रकृतीची आहे. साधारणपणे ३५० ते ४०० लोकसंख्या असलेल्या या महादेवाच्या मुरा लोकवस्तीमध्ये पशूधनही तब्बल तीनशेच्या आसपास आहे. अविकसित गावाचा विकास ही राजकीय पुढारी आणि ठेकेदारांच्या उत्कर्षाचे साधन असते त्यास महादेवाचा मुरादेखील अपवाद राहिला नाही.

येथे असलेल्या पावणेदोनशे मतदारांपैकी काहींना मतदानासाठी बोरघरला तर काहींना गोवेले येथे जावे लागत असल्याने येत्या विधानसभा निवडणुकीवेळी मतदानाला महादेवाचा मुरा उतरायचाच नाही, असा ठाम निर्धार महादेवाच्या मुरा येथील स्त्री-पुरूष मतदारांनी केला असता प्रशासनाला या इशाऱ्याची दखल घ्यावी लागली होती. अद्याप या गावाला आदिवासी महसुली गावाचा दर्जा मिळाला नसून हे गांव बोरघर आणि गोवेले या दोन ग्रामपंचायतींमध्ये विभागलेले दिसून येत आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# अँड्रॉईड १४ : फोटो, व्हिडीओ गॅलरीसाठी जबरदस्त फिचर




गुगलने अँड्रॉईड १४ चा नवीन डेव्हलपर्स प्रीव्ह्यू जारी केला आहे. हा कंपनीकडून आलेला दुसरा प्रीव्ह्यू आहे. यामध्ये अनेक प्रकारचे फिचर्स पहायला मिळत आहेत. नवीन अपडेट ही चांगली प्रायव्हसी, सुरक्षा आणि परफॉर्मन्स देत आहे. म्हणजेच येत्या काही महिन्यांत येणाऱ्या अँड्रॉईड १४ मध्ये तुम्हाला या गोष्टी मिळणार आहेत.


सध्या अनेकांच्या मोबाईलमध्ये अँड्रॉईड १३ आहे. या नव्या अपडेटमध्ये टॅब्लेट आणि फोल्ड होणाऱ्या मोबाईलमध्ये चांगला अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मार्चमध्ये आलेल्या डेव्हलपर्स प्रीव्ह्यूनंतर, कंपनी एप्रिलमध्ये पहिला बीटा रिलीज करू शकते, जो पुढील तीन महिन्यांसाठी व्हॅलिड राहील. यानंतर कंपनी बग्स दुरुस्त करून फायनल व्हर्जन लॉंच करू शकते, जे स्थिर असेल.

अँड्रॉईड १४ च्या Developers Preview २ मध्ये एक खास फिचर दिसले आहे. ते म्हणजे गॅलरी सरसरकट सर्वांसाठी खुली राहणार नाही किंवा काही फोटो व्हॉल्टमध्ये ठेवण्याचे फिचर्स आता जुने झाले आहे. युजर त्याला हव्या तेवढ्याच फोटोंचा ॲक्सेस इतरांना देऊ शकणार आहे. थोडेफार व्हॉल्टसारखेच हे फिचर आहे, परंतू ते आता दुसऱ्या बाजुने काम करणार आहे.

सध्या एखाद्या ॲपला किंवा फोटो, व्हिडीओचा ॲक्सेस दिल्याने सारे काही दिसत होते. आता दुसऱ्यांना दाखवायचे आहे, तेच फोटो, व्हिडीओ पाहता येणार आहेत. क्रेडेन्शियल मॅनेजरमध्ये देखील बदल करण्यात आले आहेत. अधिक चांगले णख दिसत आहे. सुधारित -पवीळव मेमरी व्यवस्थापन प्रणाली देण्यात आली आहे. तुम्ही भारतात रहात असाल तर इथे तापमान सेल्सिअसमध्ये दिसेल, तर युरोपातील लोकांना फॅरेनहाइटमध्ये तापमान दिसेल, अशी फिचर्सही देण्यात आली आहेत.

सध्या हे अपडेट्स सामान्य युजर्ससाठी नसून ते डेव्हलपर्स आणि टेस्टर्ससाठी आहेत. गुगलच्या प्रोग्रॅमसाठी बरेचजण काम करतात, काही फुकटात काम करतात. ते गुगलला बग, बदल, दुरुस्तीबाबत कळवितात आणि त्यानंतर त्यात योग्य बदल करून ते बीटा आणि नंतर फायनल व्हर्जनमध्ये येते.

# आज राष्ट्रीय लसीकरण दिवस



**निमित्त**

रोगांपासून दूर ठेवण्यासाठी लसीकरण महत्वाचे आहे. राष्ट्रीय लसीकरण दिवस २०२३ जवळ येत आहे, चला तर मग आपण भारतातील या दिवसाचा इतिहास आणि महत्त्व पाहू या. दरवर्षी १६ मार्च रोजी राष्ट्रीय लसीकरण दिन साजरा केला जातो. सार्वजनिक आरोग्यामध्ये लसीकरणाचे महत्त्व सांगण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या दिवशी १९९५ मध्ये, भारतात पहिला तोंडा वाटे पोलिओ लसीकरण डोस देण्यात आला. यापुढे दरवर्षी हा दिवस राष्ट्रीय लसीकरण दिन म्हणून पाळला जातो.

संसर्गजन्य आजारांची वाढ रोखण्यासाठी लसीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. हे हस्तांतरणीय रोगांचे नियंत्रण आणि निर्मूलन करण्याचे साधन म्हणून काम करते. सामान्य लोकांचे आरोग्य सुधारणे आणि निरोगी राहणीमानाच्या दृष्टीने त्यांचे दर्जा उंचावणे हे महत्त्वाचे आहे. आपण आज या पोस्टमध्ये, लसीकरणाच्या इतिहासापासून सुरू होणार्या काही महत्त्वाच्या तपशीलांबद्दल पाहणार आहोत.

इतिहास : सराव म्हणून लसीकरणाचा शेकडो वर्षांपूर्वीचा इतिहास १७०० च्या दशकात आहे. एडवर्ड जेनर, एक इंग्लिश चिकित्सक आणि शास्त्रज्ञ ही अशी व्यक्ती आहे ज्यांना लसींचे संस्थापक मानले जाते. १७९६ मध्ये त्यांनी १३ वर्षांच्या मुलाचे लसीकरण करण्यासाठी काउपॉक्स विरूद्ध लस वापरली. त्यांनी चेचक विरूद्ध प्रतिकारशक्ती प्रस्थापित करण्यासाठी देखील समर्थन केले. आणि चेचक विरूद्ध पहिली लस १७९८ मध्ये विकसित केली गेली.

१८ व्या आणि १९ व्या शतकात, चेचक विरूद्ध मोठ्या प्रमाणात लसीकरण चालू राहिले आणि १९७९ मध्ये मोठ्या प्रमाणात लसीकरणामुळे चेचकांचे उच्चाटन झाले. त्याचप्रमाणे लुई पाश्वर यांनी केलेल्या प्रयोगांमुळे १९ व्या शतकात कॉलराविरूद्ध लसीकरण विकसित करण्यात मदत झाली. त्याचप्रमाणे, नंतरच्या काळात वेगवेगळ्या इतर लसी विकसित केल्या गेल्या.

१९४० च्या दशकात, वैज्ञानिक ज्ञानाच्या आविष्कारांमुळे मोठ्या प्रमाणावर लसीचे उत्पादन झाले. १९६० च्या दरम्यान, गोवर, गालगुंड आणि रुबेला विरूद्ध लस शोधण्यात आली, ज्याला चचठ लस म्हणून ओळखले जात असे. गेल्या काही वर्षांमध्ये, आणखी महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या ज्यामुळे लसींच्या जगात प्रगत लसी तंत्रज्ञानाचा समावेश करून मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. कोविड-१९ लसींचा नुकताच झालेला विकास आणि या रोगाविरुद्ध मोठ्या प्रमाणावर लसीकरण मोहीम हे लसीकरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय वाढीचे उदाहरण आहे.

१६ मार्च राष्ट्रीय लसीकरण दिनी, तुमचा जन्म झाला त्या दिवसापासून तुम्हाला आतापर्यंत मिळालेल्या सर्व लसी पाहण्यासाठी तुम्ही लसीकरणावरील तुमच्या नोंदी पाहू शकता. या लसींनी तुम्हाला जीवनातील अनेक घातक आजारांपासून वाचवले आहे. तथापि, कोणत्याही कारणास्तव तुम्ही चुकलेले कोणतेही लसीकरण असल्यास किंवा कोणत्याही आरोग्य स्थितीमुळे तुम्हाला लसीकरणाची आवश्यकता असल्यास, तुम्ही तुमच्या डॉक्टरांशी भेटीची वेळ ठरवू शकता आणि दिवसाचा सर्वोत्तम प्रकारे साजरा करण्यासाठी डोस मिळवू शकता.

पुढे, तुम्ही लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि लसीकरणाच्या योग्य वापराबद्दल जागरूक करण्यासाठी सोशल मीडियावर संदेश पसरवू शकता.

**(साभार : वेबशोध)**

**क्लिक...क्लिक...!**



**म्हसळा : वाढत्या उष्णतेमुळे तालुक्यातील मांदाटणे परिसरात वनक्षेत्रात वणवे लागत आहेत. त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीचे मोठे नुकसान झाले आहे.** (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर



# जिमला जाण्यापूर्वी खा 'हे' पदार्थ, मिळेल एनर्जी

जिममध्ये वर्कआउटसाठी खूप जड उपकरणे असतात. वर्कआउट करताना ही उपकरणे उचलण्यासाठी खूप एनर्जी लागते. पण बरेच जण जिमला जाण्यापूर्वी खाण्याकडे लक्ष देत नाही, किंवा अर्धपोट जिमला जातात. पण असे न करता प्री - वर्कआउट फूडकडे लक्ष दिले पाहिजे. पण वर्कआऊटपूर्वी काय खावं असा प्रश्न अनेकांना पडतो. त्यामुळे असे ५ प्री वर्कआउट फूड जाणून घेऊ जे तुम्ही जिमला जाण्यापूर्वी खाऊ शकता.

**ओटमील :** ओटमीलमध्ये शरीरास आवश्यक कार्बोहायड्रेट्स आणि फायबरचे प्रमाण भरपूर असते. यातील कार्बोहायड्रेट्समुळे आपल्या शरीरास एक एनर्जी प्रदान करते. यामुळे न थकता वर्कआउट करता येतो.

**उकडलेले चिकन :** जर तुम्ही नॉनव्हेज खात असाल तर तुमच्या वर्कआउट रुटीनमध्ये चिकनही खाऊ शकता, यातील प्रथिने शरीराच्या एनर्जीसाठी फायदेशीर ठरतात. यातील लीन प्रोटीन स्नायूंना मजबूत करतात. यामुळे थोडी मिरपूड, मीठ आणि त्यात चिकन टाकून उकडवून ते जिमला जाण्यापूर्वी खाऊ शकता.

**स्मूदी :** स्मूदीज बनवणे थोडे अवघड आणि वेळ खाऊ असते. पण यात शरीरासाठी आवश्यक पोषक तत्वांचा उत्तम स्रोत आहे. यातील बेरी स्मूदी, ग्रीन स्मूदी तुम्हाला हेवी वर्कआउट करण्यासाठी पुरेशी एनर्जी देतील. बेरी स्मूदीजमध्ये ब्लूबेरी, स्ट्रॉबेरी इत्यादींचा समावेश करु शकता. पण हिरव्या स्मूदीमध्ये पालेभाज्या, एवोकॅडो, फळे इत्यादींचा समावेश असतो.

**केळी :** जिमला जाण्यापूर्वी केळी हे सर्वात जास्त खाल्ले जाणारे फळ आहे. हे फळ कार्बोहायड्रेट्स आणि पोटॅशियममध्ये समृद्ध आहे. यातील कार्बोहायड्रेट्स शरीराला आवश्यक उर्जा देतात तर पोटॅशियम स्नायूमध्ये येणारे पेटके कमी करण्यास मदत करतात.

**एनर्जी बार :** अनेकदा घरात वरील पदार्थांपैकी काहीच नसते तेव्हा तुम्ही केमिस्ट दुकान आणि सुपरमार्केटमध्ये सहज उपलब्ध एनर्जी बार खरेदी करुन खाऊ शकता. एका एनर्जी बारमध्ये कार्बोहायड्रेट, फॅट, प्रोटीन आणि फायबरचे प्रमाण भरपूर असते. यामुळे शरीरास आवश्यक एनर्जी यातून मिळते.

# चौक येथील ग्रामीण रुग्णालयाची दूरवस्था



रुग्णांच्या जीवितास धोका

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक ग्रामीण रुग्णालयाची दूरवस्था झाली असून रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना धोका निर्माण झाला आहे.

चौक ग्रामीण रुग्णालयाची अवस्था अतिशय धोकादायक आहे. या रुग्णालयात जवळपास ५० गावतील रुग्ण वैद्यकीय उपचार करून घेण्यासाठी येत असतात. शिवाय मुंबई-पुणे रस्त्यावरील अपघात, अथवा अपघातातील शवविच्छेदनदेखील याच रुग्णालयात होत आहे. येथील वैद्यकीय सुविधा, वैद्यकीय अधीक्षक, डॉक्टर, सर्व कर्मचाऱ्यांची सेवा चांगल्या प्रतीची असल्याने रुग्णांचा ओढा जास्त आहे. ग्रामीण रुग्णालयाची सुमारे ३० फूट संरक्षण भिंत पडण्याच्या अवस्थेत आहे. ही भिंत पूर्णपणे कलंडली आहे. ही भिंत चौक विस्तरीत गावठाणकडे व ग्रामपंचायत चौक व तुपगाव कार्यालयात येणाऱ्या मार्गावर आहे. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांच्या जिविताला धोका निर्माण होऊ शकतो.

रुग्णालयात असणाऱ्या प्रसाधन गृहाच्या भिंतीला तडे गेले असून रुग्णालयाच्या टाईल्स उखडलेल्या असून चालताना अनेक ठिकाणी लादीचा आवाज येत आहे. येथील ऑपरेशन थिएटरला सीलिंग पडले आहे. त्यामुळे येथे बाळंतपणाचे सिझरीन करू शकत नाही. ऑपरेशन थिएटरमधील साहित्यदेखील खराब होत आहे. कोरोना काळात बंद झालेले हे थिएटर आज मोडकळीस आलेल्या स्थितीत आहे. वैद्यकीय अधिक्षक हे महीला व बालरोगतज्ज्ञ असल्याने येथे सिझरिन होऊ शकते.

> **वैद्यकीय सुविधा व सेवा चांगली असल्याने रुग्ण संख्या जास्त आहे, पण भविष्यात धोका दिसत असल्याने रुग्ण येतील की, नाही अशी चर्चा असून त्यांच्या अथवा कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्यापूर्वी दवाखान्याचे काम होणे गरजेचे असून याबाबत आपण आमदार महेश बालदी यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर माहिती देणार आहे.**
> **-राजू पाटील,** सदस्य ग्रुप ग्रामपंचायत चौक

दवाखान्याच्या खिडक्या तावदाने पूर्णपणे निकामी झाली असून त्यांच्या काच फुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे काचाऐवजी कपड्याने गुंडाळून ठेवले आहे. या खिडक्यांची रूपरेषा जुनी असून नवीन पद्धतीच्या हवा खेळती ठेवण्यासाठी त्याठिकाणी लावाव्यात अशी चर्चा सुरू आहे. दवाखान्याची सांडपाणी व्यवस्थापन कोलमडले आहे, सांडपाणी गटारात येण्या ऐवजी तिथेच मुरत आहे. त्यामुळे डासांचा प्रादूर्भाव होऊ शकतो. दवाखान्याच्या आवारात सुकलेले गवत, पालापाचोळा जमलेला आहे.

# जुने वृत्तपत्र रद्दी विक्रीसाठी दरपत्रके सादर करण्याचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग या कार्यालयातील जुन्या वृत्तपत्रांची रद्दी विक्री करावयाची आहे. त्यासाठी स्थानिक रद्दी विक्रेत्यांनी आपली दरपत्रके बंद लिफाप्यात २० मार्चपर्यंत जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाशेजारी, अलिबाग येथे सादर करावीत, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी केले आहे.

## आमदार निरंजन डावखरे यांच्या निधीतून

# पेण तालुक्यातील शाळांना संगणक वाटप



**पेण : प्रतिनिधी**

भाजपचे कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या २०२२-२३च्या स्थानिक विकास निधीतून शाळांना डिजिटल साहित्य वाटप करण्यात येत आहे.

भारतीय जनता पक्षाचे आमदार रविशेठ पाटील यांच्या सूचनेनुसार जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील हे नेहमीच पेण तालुक्यातील माध्यमिक शाळांच्या अडचणी समजून घेत त्यांना मदत करण्याचे काम करीत असतात. आताही पेण तालुक्यातील माध्यमिक शाळांची गरज लक्षात घेऊन त्यांनी पेणमधील प्रायव्हेट स्कूल, रावे हायस्कूल, जिते हायस्कूल आदी शाळांना संगणक देण्यात आले.

कोकणातील शाळा डिजिटल करण्याचा उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील सर, जिल्हा चिटणीस वासुदेव म्हात्रे, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, सुधीर जोशी, रावे हायस्कूल मुख्याध्यापक, जिते हायस्कुल मुख्याध्यापक यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आला. प्रायव्हेट हायस्कूल पेण व रावे माध्यमिक हायस्कूल, जिते माध्यमिक हायस्कूल या शाळांना प्रत्येकी एक संगणक देण्यात आले. या संगणकांचे (डिजिटल साहित्य) वाटप पेण प्रायव्हेट हायस्कूलच्या सभागृहात वैकुंठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड**

जा.क्र. पमपा/सा.बां. (उद्यान)/२२२३/प्र.क्र.०५/१३५/२०२३ दिनांक : १५/०३/२०२३

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको प्राधिकरणाकडून हस्तांतरीत झालेले खारघर, कळंबोली, कामोठे व नवीन पनवेल, पनवेल येथील विविध उद्यानामध्ये खेळणी बसविणेकरिता फक्त खालील प्रकारचे साहित्य पुरविणे व बसविणेकामी दर निश्चित करणे व अंदाजपत्रक तयार करणेकामी फक्त दर मागविण्यात येत आहे. दि. १७/०३/२०२३ ते २४/०३/२०२३ रोजी पर्यंत सायं. ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या बांधकाम (उद्यान) विभागाकडे सादर करावित.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | | प्रत्येक बाबीचा दर GST सहित रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1 | See Saw | Code SS03 | |
| 2 | Double Swing (Arc Swing) | Code SW03 | |
| 3 | MAPS | Code MPS 01 | |
| 4 | Animal MGR | Code MR05 | |
| 5 | Monkey Go Round (MGR) | Code MR06 | |
| 6 | FRP Plain Slide | Code SL03 | |
| 7 | Dustbin Penguin | Code DB 06 | |

सही/-
(कैलास गावडे)
उप आयुक्त
पनवेल महानगरपालिका



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost In Lakh | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-28/ 22-23/ **RFx No. 7000026341** | Work of 22 kV Cable Shifting and Jointing Work at 400 kV Nagothane s/s under 400 KV R.S. (O&M) Division, Nagothane. **1st Ext.** | Rs. 3.84 | 22.03.2023 up to 23:59 Hrs. |

**EMD:** Rs. 5,000/- **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob. No. 9461456635 e-mail ID: **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following work.

**Tender No.:** EE/400kV/RS (O&M)/ DN/KHR/Ten-2/2023-24 **(RFx No. 7000026630)**

**Period for Submission of E-Bid:** 14.03.2023 to 21.03.2023 up to 23:59 Hrs

**Name of Work:** Hiring of Vehicle (Mahindra TUV/SUMO, etc.) for Maintenance/ Testing Unit at 400kV RS O&M Dn., Kharghar for period 01.04.2023 to 31.03.2024

| Estimated Cost (in Rs.) | EMD (in Rs.) | Tender Fee (in Rs.) | Closing Date | Technical Opening Date | Commercial Opening Date |
|---|---|---|---|---|---|
| 5,99,998.98 (Including GST) | 5,999.99 | 500/- + GST | 21.03.2023 up to 23:59 Hrs | 22.03.2023 at 10:00 Hrs (If possible) | 22.03.2023 at 10:15 Hrs (If possible) |

**Contact Persons:** (1) Mr. S.J. Darekar, Executive Engineer (Charge), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040
2) Ms. P.C. Deshpande, Dy. EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details, visit our website **www.mahatransco.in**

1) Tender documents can be downloaded by online only from aforesaid website.
2) Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering (New) portal: **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO e-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

**Sub:** Hiring of vehicle (Swift Desire/Ertiga/TUV-300/Tata Sumo/Chevrolet Enjoy/Mahindra Bolero/X-cent or Equipment) with Driver & Fuel for EHV Project Division Kalwa, EHV Project Lines S/Dn Kalwa, EHV Project Substation S/Dn Kharghar, EHV Project Substation & Line S/Dn Panvel & (Bolero/Scorpio/TUV-300) for EHV S&I S/Dn Kalwa for Financial year 2023-24.

| E-Tender No. | Estimated Cost | RFx No. |
|---|---|---|
| Division Office: EE/EHV/P/Dn/KLW/T-9/2022-2023 | Rs. 5,72,813.16 | **7000026629** |
| EHV Project Lines S/Dn Kalwa: EE/EHV/P/Dn/KLw/T-10/2022-2023 | Rs. 5,72,813.16 | **7000026641** |
| EHV Project Substation S/Dn Kharghar: EE/EHV/P/Dn/KLW/T-11/2022-2023 | Rs. 5,99,991.36 | **7000026642** |
| EHV Project Substation S/Dn Panvel: EE/EHV/P/Dn/KLW/T-12/2022-2023 | Rs. 5,58,090.48 | **7000026643** |
| EHV Project Lines S/Dn Panvel: EE/EHV/P/Dn/KLW/T-13/2022-2023 | Rs. 5,58,090.48 | **7000026644** |
| S&I S/Dn Kalwa: EE/EHV/P/Dn/KLW/T-14/2022-2023 | Rs. 5,97,005.16 | **7000026656** |

**Bid Submission Period:** 16.03.2023 @ 12:00 Hrs to 23.03.2023 @ 13:00 Hrs
**Bid Opening Date and Time:** 23.03.2023 at 14:00 Hrs if possible. For further details, visit our website **https://srmtender.mahatransco.in/**
**Contact Person:** Add. EE (O) Tel No. 9930496198.
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV Project Division, Kalwa**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मौजे - भाताण, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| भूमापन नं /हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १९१/३ | ०-३१-०० पो.ख. ०-०४-०० **एकूण ०-३५-००** | ०.८१ | **श्री. पांडूरंग धोंडू घरत** |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १५/०३/२०२३.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो.क्र. ९९३०३६९८६१



**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्या.) पनवेल.**
नोंदणी क्र. : आर.जी.डी. (पी.डब्ल्यू.एल.) आर.एस.आर. (सी.आर) ५१८/३१-८-१९९५.
६२६ अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराशेजारी, टिळक रोड, पनवेल - जि. रायगड. ४१० २०६.
फोन : २७४६७३९२, २७४६९८६५. Email - kamalmahila@yahoo.in

**जप्त केलेल्या व ताबे कब्जात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची जाहीर नोटीस**

जा.क. २८/५११, वसुली-स्थावर जाहीरनामा
वसुली अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : १५/०३/२०२३

ज्या अर्थी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या कर्जाची थकबाकी रक्कम अधिक व्याज रू. ३६,०९,२०६/- (अक्षरी रूपये छत्तीस लाख नऊ हजार दोनशे सहा मात्र) येणेपोटी श्री. लक्ष्मण मनु चेहरा रा. लोटस बिल्डिंग, ए विंग, ५ वा मजला, रूम नं. ५०२, चॅनल उपवन जवळ, साईनगर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांनी त्यांच्या कर्जापोटी तारण दिलेली श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर व श्रीमती ज्योती किरण कल्याणकर यांची किनारा को ऑप. हौ. सोसायटी मधील फ्लॅट नं. बी. २, तळमजला, प्लॉट नं. ५२१/१, २, सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को. ऑप. हौ. सो., पनवेल, ता-पनवेल, जि-रायगड ही मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ज्या अर्थी सदरील रक्कम जप्तीमुळे व विक्रीमुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर भार व खर्च वसुली करीता उक्त मालमत्ता जाहीर लिलाव पध्दतीने विकणे आवश्यक वाटल्यावरून अशी नोटीस देण्यात येते की, सदर श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर व सौ. ज्योती किरण कल्याणकर, रा. फ्लॅट नं. बी.२, तळमजला, प्लॉट नं. ५२१ / १, २, सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को. ऑप. हौ. सो, पनवेल, ता-पनवेल, जि-रायगड यांनी उक्त स्थावर व तिच्यापासून मिळणारा भोगवटा व तिची अगर त्यामधील काही भागाची विल्हेवाट लावून मिळणारा लाभांश या सर्व प्रकारच्या हक्कांचा सोबत जोडलेल्या लिलावाच्या अटी व शर्तीस व ठरविलेल्या किंमतीस (अपसेट प्राईज) यांना अधिन राहून जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दि. ०५/०४/२०२३ रोजी ठिक ११.०० वाजता कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल चे कार्यालय श्री. सुनिल सदानंद गद्रे वसुली अधिकारी हे मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील फ्लॅट नं. बी. २, तळमजला, प्लॉट नं. ५२१ / १, २, सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को. ऑप. हौ. सो., पनवेल, या मिळकतीचे जाहीर लिलावाने विक्री करतील.

**स्थावर मिळकतीचा तपशिल**

| अ. क्र. | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | ज्या पक्षकाराविरुद्ध प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याचे नाव | गावाचे नाव व तालुका | गट नं. | क्षेत्र | आकारणी | कब्जेदार सदरी असणारे नाव | हक्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०९ २०१७/१८ | श्री. लक्ष्मण मनु चेहरा, श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर, श्रीमती ज्योती किरण कल्याणकर, श्री. कृष्णा बालाजी आवराळे | पनवेल | पनवेल महानगर पालिका हद्दीतील प्लॉट नं.५२१/१, २,सब प्लॉट नं. २७ व ३५ वरील किनारा को.ऑप. हौ.सो.लि. फ्लॅट नं. २,तळमजला,बी.२ | ४२०.३४ चौ.फुट कारपेट | | श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर श्रीमती ज्योती किरण कल्याणकर | नाही | |

उक्त मालमत्तेसंबंधी अन्य कोणत्याही व्यक्तीने प्रतीपादन करण्यात आलेला त्याचा मालकी हक्क भार अगर हितसंबंध याबाबतच्या खरेपणाची कसलीही हमी देण्यात येणार नाही. विक्री आदेश काढण्यात आलेल्या तारखेस थकबाकीदाराकडून देणे असलेली येणे बाकी रक्कम अधिक व्याज रू. ३६,०९,२०६/- अधिक सरचार्ज व इतर खर्चाच्या वसुलीसाठी विक्रीचा आदेश देण्यात आला आहे.

वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे यांनी उक्त मालमत्ता यापूर्वीच जप्ती आदेश क्र. वसुली स्थावर जप्ती दिनांक २७/०१/२०२३ अन्वये जप्त केली आहे.

**स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव**

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेचे खालील नामनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांच्या खालील स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव त्याचे नावासमोर दर्शवलेल्या वेळी, रोजी, ठिकाणी होणार आहे. तरी, ज्यांना सदर मिळकतीच्या लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण पाहून घ्यावे व लिलावाच्या दिवशी व वेळी उपस्थित रहावे.

| अ.क्र. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकत नं. व गट नं. ठिकाण | क्षेत्र हे.आर. | लिलाव करावयाचा हिस्सा | आकार रु.पै. | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. लक्ष्मण मनु चेहरा रा. लोटस बिल्डिंग, ए विंग, ५ वा मजला, रूम नं. ५०२, चॅनल उपवन जवळ, साईनगर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील प्लॉट नं. ५२१/१, २, सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को. ऑप. हौ. सो. लि. बावन बंगला, पनवेल या इमारतीमधील ब्लॉक नं. १, तळमजला, बी/२ विंग, क्षेत्र ४२०.३४ चौ. फुट. | क्षेत्र ४२०.३४ चौ. फुट. | क्षेत्र ४२०.३४ चौ. फुट. | | बुधवार दि. : ०५/०४/२०२३ वेळः सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजता. कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट १ ,६२६, मारूती अपार्टमेंट पनवेल ४१०२०६. |

**टिप -** १) लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाचे वेळी करण्यात येईल. २) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केला जाईल. ३) येणे रक्कमेचा विचार करून मालमत्तेची विक्री केली जाईल. ४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/०३/२०२३
जावक क्र. : २८/५११-२०२२-२३

**सही/-**
**सुनिल सदानंद गद्रे**
विक्री व वसुली अधिकारी
कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी म. पनवेल.



**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्या.) पनवेल.**
नोंदणी क्र. : आर.जी.डी. (पी.डब्ल्यू.एल.) आर.एस.आर. (सी.आर) ५१८/३१-८-१९९५.
६२६ अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराशेजारी, टिळक रोड, पनवेल - जि. रायगड. ४१० २०६.
फोन : २७४६७३९२, २७४६९८६५. Email - kamalmahila@yahoo.in

**जप्त केलेल्या व ताबे कब्जात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची जाहीर नोटीस**

जा.क. २८/५११, वसुली-स्थावर जाहीरनामा
वसुली अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : १५/०३/२०२३

ज्या अर्थी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या कर्जाची थकबाकी अधिक व्याज रक्कम रू. ३६,५२,५४०/- (अक्षरी रूपये छत्तीस लाख बावन्न हजार पाचशे चाळीस मात्र) येणेपोटी श्रीमती ज्योती किरण कल्याणकर व श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर रा. फ्लॅट नं. बी./१/८, किनारा को. ऑप. हौ. सो., पनवेल, ता-पनवेल, जि-रायगड यांची खाली नमुद केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ज्या अर्थी सदरील रक्कम जप्तीमुळे व विक्रीमुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर भार व खर्च वसुली करीता उक्त मालमत्ता जाहीर लिलाव पध्दतीने विकणे आवश्यक वाटल्यावरून अशी नोटीस देण्यात येते की, सदर श्रीमती ज्योती किरण कल्याणकर व श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर रा. फ्लॅट नं. बी/१/८, किनारा को.ऑप. हौ. सो., पनवेल, ता-पनवेल, जि-रायगड यांनी उक्त स्थावर व तिच्यापासून मिळणारा भोगवटा व तिची अगर त्यामधील काही भागाची विल्हेवाट लावून मिळणारा लाभांश या सर्व प्रकारच्या हक्कांचा सोबत जोडलेल्या लिलावाच्या अटी व शर्तीस व ठरविलेल्या किंमतीस (अपसेट प्राईज) यांना अधिन राहून जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दि. ०५/०४/२०२३ रोजी ठिक ११.०० वाजता कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल चे कार्यालय श्री. सुनिल सदानंद गद्रे वसुली अधिकारी हे मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील बावन बंगला येथील फायनल प्लॉट नं. ५२१/२ वरील किनारा को.ऑप.हौ. सोसायटी मधील फ्लॅट नं. सी ३/२, तळमजला, ५९३.३२ चौ.फुट बिल्टअप या मिळकतीचे जाहीर लिलावाने विक्री करतील.

**स्थावर मिळकतीचा तपशिल**

| अ. क्र. | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | ज्या पक्षकाराविरुद्ध प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याचे नाव | गावाचे नाव व तालुका | गट नं. | क्षेत्र | आकारणी | कब्जेदार सदरी असणारे नाव | हक्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दावा क्र.६७ २०१८-१९ जा.क्र.२६९८/ सहानि/पनवेल/ ता.१६/०५/२०१९ पनवेल/बी.५/ क्र.१०१ सन २०१८-१९ | श्रीमती ज्योती किरण कल्याणकर, श्री. किरण दत्तात्रेय कल्याणकर, श्री. किरण पांडुरंग सावळेकर | पनवेल महानगर पालिका पनवेल ता. पनवेल,जि. रायगड | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील,बावन बंगला येथील फायनल प्लॉट नं.५२१/२ वरील किनारा को.ऑप. हौ.सो.लि. मधील फ्लॅट नं. सी ३/२ तळमजला | ५९३.३२ चौ.फुट बिल्टअप ही मिळकत | - | श्रीमती ज्योती किरण कल्याणकर श्री. किरण दत्तात्रेय कल्याणकर | नाही | |

उक्त मालमत्तेसंबंधी अन्य कोणत्याही व्यक्तीने प्रतीपादन करण्यात आलेला त्याचा मालकी हक्क भार अगर हितसंबंध याबाबतच्या खरेपणाची कसलीही हमी देण्यात येणार नाही. विक्री आदेश काढण्यात आलेल्या तारखेस थकबाकीदाराकडून देणे असलेली येणे बाकी रक्कम अधिक व्याज रू. ३६,५२,५४०/- अधिक सरचार्ज व इतर खर्चाच्या वसुलीसाठी विक्रीचा आदेश देण्यात आला आहे.

वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे यांनी उक्त मालमत्ता यापूर्वीच जप्ती आदेश क्र. वसुली स्थावर जप्ती दिनांक १५/०२/२०२३ अन्वये जप्त केली आहे.

**स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव**

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेचे खालील नामनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांच्या खालील स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव त्याचे नावासमोर दर्शवलेल्या वेळी, रोजी, ठिकाणी होणार आहे. तरी, ज्यांना सदर मिळकतीच्या लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण पाहून घ्यावे व लिलावाच्या दिवशी व वेळी उपस्थित रहावे.

| अ.क्र. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकत नं. व गट नं. ठिकाण | क्षेत्र हे.आर. | लिलाव करावयाचा हिस्सा | आकार रु.पै. | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर व श्रीमती ज्योती किरण कल्याणकर. रा. किनारा को. ऑप.हौ.सोसायटी लि. प्लॉट नं.बी.१/४, बावन बंगला पनवेल | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील फायनल प्लॉट नं. ५२१/२ वर बांधलेली किनारा को. ऑप. हौसिंग सोसायटीमधील फ्लॅट नं.सी./३/२, तळमजला ज्याचे क्षेत्र ५९३.३२ चौ. फुट. | ५९३.३२ चौ. फुट. बिल्टअप | ५९३.३२ चौ. फुट. बिल्टअप | | बुधवार दि. : ०५/०४/२०२३ वेळः सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजता. कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट १ ,६२६, मारूती अपार्टमेंट पनवेल ४१०२०६. |

**टिप -** १) लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाचे वेळी करण्यात येईल. २) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केला जाईल. ३) येणे रक्कमेचा विचार करून मालमत्तेची विक्री केली जाईल. ४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/०३/२०२३
जावक क्र. : २८/५११-२०२२-२३

**सही/-**
**सुनिल सदानंद गद्रे**
विक्री व वसुली अधिकारी
कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी म. पनवेल.

# खराब वातावरणाने आजार बळावले

## नवी मुंबईत तापाची साथ ; सर्दी, खोकल्याचे रुग्ण सर्वाधिक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वातावरणातील उष्ण-दमट हवामान आणि वायू प्रदूषण यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम जाणवत आहे. नोव्हेंबर-डिसेंबरपासून नवी मुंबई शहरात ही ताप विशेषतः सर्दी-खोकल्याचे रुग्ण वाढत आहेत. पालिका तसेच खासगी रुग्णालयात ताप, सर्दी, खोकल्याने जडलेल्या रुग्णांत वाढ झाल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. नोव्हेंबर डिसेंबरपासुन स्वाइन फ्ल्यू चाचण्या केल्या आहेत, मात्र त्या निगेटिव्ह येत आहे.





गेल्या काही दिवसांपासून देशासह इतर शहरात इन्फ्ल्युन्झाचा (H3N2) संसर्ग वाढत आहे. नवी मुंबई शहरात ही महापालिकेच्या बाह्यरुग्णांत ५० टक्के रुग्ण ताप,सर्दी, खोकल्याचे आढळत आहेत. यामध्ये पाच वर्षांखालील लहान मुलांमध्ये प्रमाण जास्त आहे. त्यामुळे नवी मुंबई शहरात ही इन्फ्ल्युन्झा संशयित रुग्ण असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. महापालिका आरोग्य विभागाने बालरोगतज्ञ आणि डॉ. बनसोडे सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ यांच्याशी चर्चा केली आहे. ओपीडीमध्ये, विशेषतः पाच वर्षांपेक्षा लहान मुलांमध्ये खोकला सर्दी प्रकरणांमध्ये सतत वाढ पाहत आहोत. H1N1 चाचण्या करीत आहोत मात्र त्या निगेटिव्ह येत आहेत. H3N2 किंवा adenovirus असण्याची शक्यता आहे.



एनआयव्ही पुणेने काही वैद्यकीय महाविद्यालयात तसेच ठाण्यातील आरजीएम्स याठिकाणी इन्फ्ल्युन्झा चाचण्या होत आहेत. प्राथमिक स्वरूपात महापालिका आरोग्य विभागाकडून इन्फ्ल्युन्झा निदानासाठी दोन ते तीनमुने ठाण्याला पाठवण्यात येणार आहेत, असे नवी मुंबई महापालिका आरोग्य अधिकारी प्रमोद पाटील यांनी सांगितले.

### नागरिकांना आवाहन

***वाशीमध्ये महापालिका रुग्णालयातील बाह्य रुग्णांची संख्या १४००वर गेली आहे. तसेच महापालिकेच्या तीन रुग्णालयात पाच वर्षांखालील ३०० ते ४०० लहान मुले दररोज उपचारासाठी दाखल होत आहेत. त्यामध्ये काही मुलांच्या फुफ्फुसेवर परिणाम होऊन सूज येते. त्यामुळे महापालिकेने नागरिकांना आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. यामध्ये घाबरून न जाता वाफ घेणे, गरम पाणी पिणे, मुखपट्टी वापरणे, गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे अशाप्रकारे आवाहन नवी मुंबई महापालिका आरोग्य विभागाने केले आहे.***

# घरफोडी प्रकरणातील आरोपी ताब्यात

## ▪ सात लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**तळोजा : रामप्रहर वृत्त**

तळोजा पोलीस ठाणे हद्दीमध्ये १ मार्चला रामदास पाटील यांच्या घरी अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सुमारे रोख रक्कम व सोन्याचे गंठण, असा एकूण सात लाख ३० हजारांचा मुद्देमाल चोरी केली होता. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद होता. या प्रकरणातील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

नवी मुंबई आयुक्तालयाच्या हद्दीमधील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत तपासाची चक्रे फिरत होती. कक्ष ३ गुन्हे शाखेकडून घरफोडीच्या गुन्ह्यांचा समांतर तपास सुरू होता. दरम्यान, फिर्यादी व साक्षीदार यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून ठिकठिकाणचा डंपडाटा घेवून केलेल्या तांत्रिक तपासामधून मिळालेल्या माहितीवरून कक्ष ३ गुन्हे शाखेच्या तपास पथकाने मुंबई, ठाणे, मीरा-भाईंदर या परिसरात आरोपींचा शोध सुरू केला. या गुन्ह्याच्या तपासामध्ये कक्ष ३ गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी सुमित भगवान शेळके (वय २४ रा. गांधीपाडा अलिबाग, सध्या रा. लक्ष्मी कसबे चाळ, कुर्ला पश्चीम, मुंबई) आणि श्रीनाथ सदाशिव वाघमारे (वय २५ रा. जि. सोलापूर सध्या राहणार शहीद भगतसिंग नगर, वडाळा पुर्व, मुंबई) यांना १० तारखेला अटक केली. अटक करून तपास केला असता हा गुन्हा उघडकीस आलेला आहे. आरोपींना १५ मार्चपर्यंत पोलीस कोठडी मंजूर आहे. या आरोपींवर सुमितवर नागोठणे, सातपाटी, केलवा, अलिबाग, दिघी सागरी पोलीस ठाणे हद्दीत घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. आरोपींकडून चोरीचा ऐवज जप्त करण्यात आलेला आहे.



# सिफेरर्स यूनियनच्या जनरल सेक्रेटरीपदी अमर सिंग ठाकूर

**पनवेल : वार्ताहर**

शिपींग क्षेत्रात नावाजलेल्या ाल इंडिया सिफेरर्स आणि जनरल वर्कर्स यूनियनच्या जनरल सेक्रेटरी म्हणून अमर सिंग ठाकूर यांची निवड करण्यात आली आहे.

आल इंडिया सिफेरर्स यूनियनचे अध्यक्ष संजय वासुदेव पवार यांच्या आदेशावरून अमर सिंग ठाकूर यांची जनरल सेक्रेटरी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.



या वेळी युनियनचे अध्यक्ष संजय पवार यांनी सांगितले की, जनरल सेक्रेटरी या पदावर अमर सिंग ठाकूर यांची नियूक्ति करून शिपींग क्षेत्रात नव्याने बदल करण्यास मी त्यांना हवी ती मदत करुन सिफेरर्सचे भविष्य घडवण्यास सहाय्य करेन तसेच यूनियन चे कार्याध्यक्ष अभिजीत सांगळे यांनी अमर सिंग ठाकूर यांच्या नियुक्तीवरून आता शिपींग क्षेत्रात सिफेरर्स चे सर्व प्रश्न आम्ही सोबत मार्गी लावू, असे सांगितले.

# कटरचा धाक दाखवून चोरी; अंगावरील किमती वस्तू पळवल्या

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बाईकची राईड घेताना थोडा आराम करण्यासाठी थांबलेल्या युवकांना कटरचा धाक दाखवून त्यांची चीज वस्तू आणि जॅकेट बळजबरीने घेऊन चोरटे पळून गेले. या प्रकरणी दोन अज्ञात युवकांविरोधात नेरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



दीपक चौधरी, असे यातील फिर्यादीचे नाव आहे. दीपक व त्याचे मित्र अक्षय मिनियार आणि अक्षय शिंदे हे तिघेही दोन दुचाकीने ऐरोली येथून अलिबागला निघाले होते. १२ तारखेला पहाटे साडेतीनच्या सुमारास शीव पनवेल महामार्गावर नेरूळ येथील आदिराज रेसिडेन्सी नजीक थोडा आराम करावा म्हणून गाड्या थांबवून ते येथील पदपथावर थांबले. सकाळी ४ च्या आसपास दोन स्कुटीवरून चार युवक आले. अज्ञात चार युवकांपैकी एकाने कुठले आहात? कुठे चाल्लात? अशी चौकशी केली. चौकशी करीत युवक अक्षय नजीक आला व त्याने अक्षय याने घातलेले जॅकेट मागितले. त्याला जॅकेट दिल्यावर त्याच व्यक्तीने कटरचा धाक दाखवून श्रीकांत याच्या हातातील अंगठी आणि मोबाईल बळजबरीने घेतला.

अज्ञात व्यक्ती पळून जाण्याच्या बेतात असताना दीपक याने त्याची गाडी मागून पकडली, मात्र आरोपींनी तशीच गाडी दामटली, त्यामुळे दीपक हा काही अंतरापर्यंत फरफटत गेला व जखमी झाला. या प्रकरणी नेरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, एकूण ४० हजार ८०० रुपयांचा ऐवज चोरी गेलेला आहे.

# उरण-पनवेल मार्गावरील हाईट गेट ठरतोय अपघातग्रस्त

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण-पनवेल मार्गावरील फुंडे हायस्कुलजवळील हाईट गेटला बुधवारी दुपारी ११ वाजता एक टेम्पो धडकला. हाईट गेटमुळे या मार्गावर झालेला हा सोळावा अपघात आहे. या अपघातानंतर उरण पनवेल मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती.



याचप्रकारे बोकडवीरा येथील हाईट गेट टेम्पो अपघातात कोट गावातील एक महिलेचा मृत्यू झाल्याची घटना ताजी आहे. त्यामुळे वाढत्या अपघातामुळे या मार्गाने प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जिवालाही धोका निर्माण झाला आहे. २०२१ पासून सिडकोच्या द्रोणागिरी नोड कार्यालय व फुंडे स्थानकालगतच्या खाडी पुलामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या मार्गावरील जड व प्रवासी वाहनांना रोखण्यासाठी उरण पनवेल मार्गावर हाईट गेट बसविले आहेत. बोकडविरा व फुंडे महाविद्यालयाजवळील दोन्ही बाजूच्या हाईट गेटमुळे मर्यादेपेक्षा अधिक उंचीच्या वाहनचालकांना उंचीचा अंदाज न आल्याने वाहनांचे अपघात होऊ लागले आहेत.

# वाशीमध्ये ग्राहक हक्क दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर,**
**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक ग्राहक हक्क दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व संरक्षण विभाग तसेच वैध मापन शास्त्र यंत्रणा विभाग नवी मुंबईकडून वाशी येथे नागरिकांना ग्राहक हक्कांविषयी तसेच वस्तूंवरील वजन इत्यादी माहितीबाबत प्रबोधन माहिती देऊन जनजागृती उद्देशाने आयोजन वैध मापन शास्त्र यंत्रणा वाशी नवी मुंबई विभागमार्फत करण्यात आले होते.



बाजारात विक्रीसाठी असणाऱ्या वस्तूंच्या आवरणावर एमआरपी, वजन, उत्पादनाची तारीख, पॅकेर्सवर पूर्ण पत्ता, ग्राहक, ई-मेल, दूरध्वनी क्रमांक इ. प्रिंट करणे कायद्याने बंधनकारक आहे, मात्र नागरिक ह्या सूचना तपासून घेत नसल्याने अनेकदा ग्राहकांची फसवणूक होते. शासनाच्या वैधमापन शास्त्र विभाग अशा व्यापाऱ्यांवर लक्ष ठेवते. ग्राहकांना त्यांच्या हक्कांची व विक्रेत्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव व्हावी, यासाठी दरवर्षी १५ मार्च हा दिवस जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी ग्राहकहिताची जनजागृती करणारे कार्यक्रम राबविले जातात. या जनजागृतीचा एक भाग म्हणून वैधमापन शास्त्र विभागाच्या वतीने स्टॉल लावून वजनकाटे, मापे, आवेष्ठित वस्तू उत्पादनांवरील आवश्यक माहिती इत्यादीबद्दल प्रात्याक्षिके माहितीसह देण्यात आली. तसेच ग्राहक जनजागृती माहितीपत्रके वाटण्यात आली.

या वेळी वैध मापन शास्त्र यंत्रणा विभाग एस. एस. कदम उपनियंत्रक (ठाणे, जि. पालघर) यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी - १ विभागाचे निरीक्षक सुहास कुटे आणि वाशी - २ विभागाचे निरीक्षक मधुकर राठोड यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्षेत्र सहाय्यक अनंता कोशिंबे यांनी परिश्रम घेतले.

या वेळी महिला आणि सामान्य नागरिक जागतिक ग्राहक हक्क दिन नागरिकांनी उपस्थित राहून सकारात्मक प्रतिसाद दिला. उपायुक्त माहिती मिळाली म्हणून यंत्रणेचे अधिकारी कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# नेरूळ येथे हिरकणी सन्मान सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या विद्यमाने हिरकणी सन्मान सोहळ्याचे आयोजन ज्येष्ठ नागरिक भवन नेरूळ येथे सुप्रसिद्ध लेखिका लता गुठे, कवी प्रकाश राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत फेस्कॉन आणि आयस्कॉन या संस्थांचे उपाध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साही वातावरणात झाला.

या वेळी माजी नगरसेविका नेत्रा शिर्के, संघाचे अध्यक्ष अरविंद वाळवेकर, डॉक्टर उपेंद्र किंजवडेकर, डॉ. सागर नवरे, सीमा आगवणे, विकास साठे, दीपक दिघे आदी मान्यवर तसेच ज्येष्ठ नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट काम करीत असलेल्या बारा कर्तुत्ववान महिलांचा पुरस्कार व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.



संघाचे अध्यक्ष अरविंद वाळवेकर यांनी प्रास्ताविक केले. आपल्या मनोगतात लता गुठे यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर आपले विचार मांडले. विचार बदला म्हणजे दिशा बदलेल आणि दशा बदलेल असा संदेश त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित महिलांना दिला. त्यानंतर डॉक्टर उपेंद्र किंजवडेकर, डॉ. सागर नवरे, अण्णासाहेब टेकाळे, प्रकाश राणे, नेत्रा शिर्के, सीमा आगवणे या मान्यवरांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच संघाचे प्रेरणास्थान स्वर्गवासी डॉक्टर शं. पा. किंजवडेकर यांची ९० वी जयंती साजरी करण्यात येऊन त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गतच गजानन म्हात्रे यांच्या श्री संत गजानन गीता या पुस्तकाचे प्रकाशन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे निवेदन प्रभाकर गुमास्ते व रजनी कलोसे यांनी केले तर शेवटी दीपक दिघे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यकारिणीच्या सर्व सभासदांनी विशेष मेहनत घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.

# नवी मुंबईतील 'महालक्ष्मी सरस'ला ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद

### कोट्यवधींची आर्थिक उलाढाल

**नवी मुंबई : बातमीदार**

महालक्ष्मी सरस २०२३चे आयोजन पहिल्यांदाच नवी मुंबईत झाले आहे. प्रदर्शनाचे आणखी चार दिवस बाकी असतानाच कोट्यवधींची उलाढाल होऊन अनेक स्वयंसहाय्यता गटाला मोठ्या व्यापाऱ्यांच्या आणि ठोक विक्रेत्यांच्या ऑर्डर्स मिळालेल्या आहेत.



महालक्ष्मी सरस २०२३ चे आयोजन सिडको एक्सीबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे करण्यात आले आहे. प्रदर्शनाच्या यशस्वीते बद्दल अनेक शंका कुशंका असतानासुद्धा नवी मुंबई, पनवेल, मुंबई आणि ठाणे येथील रहिवाश्यांनी या प्रदर्शनाला भरभरून प्रतिसाद दिला आहे. उमेद अभियानांतर्गत ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांच्या क्रियशिलतेला चालना देण्यासाठी आणि त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी या राज्यस्तरीय भव्य प्रदर्शनाचे आयोजन केलेले आहे.

या प्रदर्शनात ५२५ पेक्षा जास्त स्टॉल उभे करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्रातील उमेद अभियानाच्या महिलांचे ३५०, नाबार्डचे ५० देशभरातून आलेले १२५ स्टॉल या ठिकाणी लागलेले आहेत. या प्रदर्शनात उपलब्ध असलेल्या वस्तू, पदार्थ कपडे आणि इतर सामानाची शुद्धता आणि वैशिष्ट्य याबद्दल खात्री झाल्यावर ग्राहकांचा प्रतिसाद आणखी वाढला आहे. देशभरातील अनेक प्रकारच्या खाद्यपदार्थांची रेलचेल असलेले फुड कोर्ट तर ओसंडून वाहत आहे.

प्रदर्शनाचे आणखी चार दिवस बाकी असताना एक कोटी १० लाखांची फक्त रोख विक्री झाली आहे. शनिवारी आणि रविवारी महिला उत्पादकांना ठोक विक्रेते आणि व्यापाऱ्यांकडून थेट ऑर्डर्स मिळत आहेत. या प्रदर्शनात बकरीच्या दुधामासून बनविलेली साबण असो किंवा वनौषधी अशा काही दुर्मीळ वस्तू उपलब्ध आहेत. मागच्या शनिवारी रविवारी या दोन दिवसांत ८२ हजार ग्राहकांनी या प्रदर्शनाला भेट दिली. त्यानंतर सोमवार असूनसुद्धा गर्दीचा वाढता ओघ प्रदर्शनाचे यश अधोरेखित करते. अनेक सेलिब्रिटी या प्रदर्शनाला कसलाही बडेजाव न करता भेट देऊन खरेदी करत आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थी आपापल्या समुहासह भेट देत आहेत.

कोविड कालावधीनंतर आयोजित केलेल्या या प्रदर्शनात आपले कौशल्य दाखवून चांगली विक्री होत असल्यामुळे ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटाच्या महिला समाधान व्यक्त करत आहेत. उर्वरित कालावधीत आणखी मोठा प्रतिसाद देऊन या ग्रामीण महिलांच्या स्टॉलवर जास्तीत जास्त खरेदी करून महिलांच्या स्वावलंबनाला मदत करावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्यकार्यकारी अधिकारी परमेश्वर राऊत यांनी केले आहे.

# बालनाट्य स्पर्धेत 'तळमळ एका अडगळीची' ठरले अव्वल



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने आयोजित नवी मुंबई महापालिका करंडक राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आमदार गणेश नाईक यांच्या उपस्थितीत झाला.

शिवरणभूमी प्रशांत प्रतिष्ठान यांनी सादर केलेल्या 'तळमळ एका अडगळीची' या बालनाट्याने सर्वोत्तम सादरीकरण करीत नवी मुंबई महापालिका राज्यस्तरीय बालनाट्य करंड्क विजेतेपद पटकाविले. आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते त्यांना २५ हजार रक्कमेचे पारितोषिक सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रासह प्रदान करण्यात आले. कखग, पुणे या बालनाट्य संस्थेने सादर केलेल्या 'सात फेटेवाला' या बालनाट्याने व्दितीय तसेच दिलखुश स्पेशल स्कुल या नाट्यसंस्थेने सादर केलेल्या 'वारी' या बालनाट्याने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.

या वेळी क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाचे उपआयुक्त सोमनाथ पोटरे, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, सुप्रसिध्द अभिनेत्री अदिती सारंगधर, आस्ताद काळे, श्वेता पेंडसे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव उपस्थित होते.

दरम्यान, प्रसिध्द अभिनेते आस्ताद काळे यांनी विष्णुदास भावे नाट्यगृहासारखा मोठा रंगमंच उपलब्ध करून देऊन सांस्कृतिक जपणूक करण्याचे कार्य करीत असल्याबद्दल प्रशंसा केली.

# सुधागडात कच्ची करवंदे, कैऱ्यांची मेजवानी

## खवय्ये तुटून पडले; आदिवासी महिलांना मिळतोय रोजगार

**पाली : प्रतिनिधी**

बहुविध वृक्षराजीने समृद्ध असलेल्या रायगड जिल्ह्यातील सुधागड व अन्य भागातील रानावनात चैत्राच्या सुरवातीलाच करवंदाच्या जाळीत हिरवी करवंद लगडली आहेत. शिवाय रानातील व आंबा बागेतील विविध प्रकारच्या आंब्यांना कैऱ्या लागल्या आहेत. त्यामुळे आंबट करवंद व कैऱ्यांवर खवय्ये तुटून पडत आहेत. त्यांना जणूकाही मेजवानी मिळत आहे.



(छाया : धम्मशील सावंत)

सुधागड तालुक्यात फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच कच्ची करवंद बाजारात येऊ लागली आहेत आणि आता इतरही तालुक्यात करवंद विक्रीसाठी येत आहेत. आदिवासी महिला रानातून ही हिरवी कच्ची करवंद गोळा करून टोपलीत घेऊन तालुक्याच्या बाजारात विक्रीसाठी आणत आहेत. साधारण १० रुपयांना एक वाटा मिळतो.

आदिवासी महिलांना यातून चांगला रोजगारदेखील मिळतो. याशिवाय रानातील व बागेतील विविध प्रकारच्या आंब्याच्या झाडांना कैऱ्या लगडल्या आहेत. या कैऱ्यादेखील बाजारात विक्रीसाठी येत आहेत. १५ ये २० रुपयांना पाच छोट्या कैऱ्यांचा वाटा मिळत आहे. याशिवाय पिकलेली करवंद, तोरणं, भोकर, रांजण, चिकण्या, काजू आदी रानमेवा दाखल होईल.

**कच्ची करवंद व कैऱ्या बाजारात मिळू लागल्या आहेत. बच्चेकंपनी व मोठेदेखील आवर्जून या रानमेव्याचा आनंद घेतात. जिल्ह्यात हे विपुल प्रमाणात उपलब्ध असून मागणी जास्त आहे.**
**–नीलेश पवार, सुधागड**

### आंबट कैऱ्यांची लज्जत

स्थानिक कैऱ्या सुक्या व ओल्या मासळीचे कालवण, वरण आदीमध्ये टाकल्या जातात. त्यामुळे जेवणाला वेगळीच लज्जत येते. याशिवाय फोडी करून हळद, मसाला व मीठ टाकून खाल्ल्या जातात किंवा लोणचेदेखील केले जाते. सुकवून आंबोशी केली जाते, तसेच पन्हदेखील केले जाते.

### लज्जतदार चटणी

कच्च्या करवंदाची चटणी केली जाते. मीठ, तिखट, कोथिंबीर व मिरची टाकून ही लज्जतदार चटणी केली जाते. शिवाय मीठ टाकून नुसती चटणी खाल्ली तरी देखील चालते. काही जण मिठाच्या किंवा साखरेच्या पाण्यात टाकून ही चटणी चवीने खातात. तसेच या करवंदांचे लोणचं देखील बनवले जाते.

# गेल इंडिया कंपनीच्या वतीने अतिशीघ्र तुकडीचे प्रात्यक्षिक

**खालापूर : प्रतिनिधी**

गेल इंडिया लिमिटेडचे इंटर मेडिएट पिगिंग स्टेशन (आयपी–४) बोरले येथे महाराष्ट्र पोलीस नवी मुंबई यांची अतिशीघ्र दक्षता तुकडीच्या सहाय्यतेने गेल मुंबईद्वारे प्रत्याक्षिक सादर करण्यात आले. मुंबई, पुणे जुन्या महामार्गावरील टोल नाक्याजवळ बोरले गावाजवळ असणाऱ्या गेल कंपनीच्या कार्यालयात हे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

यामध्ये दोन बंदुकधारी अतिरेकी मर्मस्तलामध्ये दाखल होन एक सुरक्षारक्षक व एक सफाई कामगार यांना बंदुकीचा धाक दाखवून बंदी ठेवण्यात आले आणि त्यांना अतिशीघ्र दक्षता तुकडीद्वारे कसे मुक्त केले जाते व बंदुकधारी अतिरेक्यांना कसे नेस्तनाबूत केले जाते याचे संपूर्ण प्रत्याक्षिक सादर करण्यात आले.

या ठिकाणी गेल इंडिया लिमिटेडचे विविध पदाधिकारी जसे सुरक्षा प्रभारी, अग्नि व संरक्षा प्रभारी, जनरल मॅनेजर (प्रचलन व अनुरक्षण), सुरक्षा पर्यवेक्षक, सुरक्षारक्षक, महाराष्ट्र पोलीस अतिदक्षता तुकडी कळंबोली, पनवेल पोलीस स्टेशन तुकडी, बॉम्ब निकामी पथक कळंबोली, आतंकवादीविरोधी तुकडी नवी मुंबई, वाहतूक पोलीस तुकडी पनवेल, फायर ब्रिगेड पनवेल, मेडिकल तुकडी आणि ॲम्ब्युलन्स यांचा समावेश होता.

प्रत्याक्षिकादरम्यान आरजीएमसी कंट्रोल रूममध्ये कार्यकारी निर्देशक आणि इतर विभागप्रमुख उपस्थित राहिले. त्यांनी आकस्मिक परिस्थितीबद्दल नियोजन करण्यात आले.



# उन्हाळी भातशेती बहरली; शेतकऱ्यांची लगबग

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सुमारे ४० ते ५० हजार हेक्टर उन्हाळी भातशेती होते. सुधागड, माणगाव व रोहा परिसरात काही ठिकाणी कालव्याच्या पाण्यावर उन्हाळी भातशेती केली जाते. सध्या शेतकऱ्यांची उन्हाळी भात शेतीच्या कामांची लगबग सुरू आहे.

वाफ्यांमध्ये भाताची रोपे चांगली तरारली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती भरघोस पीक लागणार आहे. दीर्घकाळ राहिलेल्या पावसाने या वर्षी जिल्ह्यातील पावसाळी भातशेतीचे मोठे नुकसान केले. जमिनीत अधिक ओलावा राहिल्याने रब्बी हंगामातील कडधान्य शेतीचेही नुकसान झाले. त्यामुळे यंदा शेतकरी प्रत्येक शेतकामात अचूक नियोजन करीत आहे.

हमखास पाणी, पोषक वातावरण, शेतीची योग्य मशागत आणि हवामानाची साथ यामुळे उन्हाळी भातशेतीमधून शेतकऱ्यास हुकमी पिक मिळते. पावसाळयातील शेतीतून मिळणार्या उत्पादन व उत्पन्नापेक्षा उन्हाळी शेतीतून अधिक चांगले उत्पादन व उत्पन्न मिळते. त्यामुळे शेतकरी समाधानी असतात. काही शेतकरी तर पावसाळयाऐवजी उन्हाळी शेती करण्यालाच प्राधान्य देत आहेत.

सध्या या भातशेतीच्या मशागतीची कामे जोरात सुरू आहेत. शेती परिसरात पाणी व भात रोपांमुळे अधिक थंडावा निर्माण होतो, तसेच उन्हाचा तडाखा वाढल्यावर या भागात मात्र गारवा जाणवतो.



# कोंढाणे धरणग्रस्तांना भू-भाडे मिळण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

शासन निर्णयाप्रमाणे २०११साली कर्जत तालुक्यातील कोंढाणे धरणाचे काम सुरू झाले. आपल्या परिसराचा विकास व्हावा, शेतीला पाणी मिळावे, या उद्देशाने सर्व कोंढाणे, चोची, उंबरवाडी आणि मुंडेवाडी येथील ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी जमिनी देण्यास होकार दिला. त्यावेळी जमिनीचा मोबदला मिळेपर्यंत शेतकऱ्यांना रेडी रेकनरच्या १० टक्के भू – भाडे देण्यात येईल, असे सांगितले, मात्र अद्याप एकही पैसा भाडे मिळाले नाही. भू–भाडे मिळावे, यासाठी भारतीय जनता पक्ष किसान मोर्चाच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे.



कोंढाणे धरणाच्या कामास सुरुवातसुद्धा झाली, परंतु काही अनिमितता असल्याने प्रकल्प वादतीत होऊन काम बंद झाले, परंतु या कालावधीत ठेकेदाराने सुमारे ४० टक्के भरावाचे काम केले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी धरणाच्या भरावाखाली किंवा १५ ते २० फूट खोदल्यामुळे नष्ट झाल्या. गेल्या ११–१२ वर्षांत शेती करता आली नाही. शेती गेली, मोबदला नाही, भू–भाडे नाही अशा कचाट्यात शेतकरी सापडला. आजमितीस एक रेडिरेकनरपेक्षा जास्त म्हणजे सुमारे एक लाख रुपये एकरी भू–भाडे मिळायला हवे होते, पण ते मिळाले नाही.

सिडकोच्या माध्यमातून धरण होत असून त्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. आपण काढलेल्या नोटिफिकेशनप्रमाणे २१ मार्चपर्यंत जे शेतकरी मर्जीने तयार होतील त्यांना २५ टक्के इंसेंटिव्ह दिला जाईल. मुदतीच्या आत होकार न दिल्यास संपादन केले जाईल. त्यास २५ टक्के इन्सेटिव्ह मिळणार नाही. आम्हा शेतकऱ्याचा जमीन देण्यास विरोध नव्हता आणि आजही नाही, परंतु आम्हाला गेल्या १२ वर्षांचे भूभाडे मिळालेच पाहिजे. ते जोपर्यंत मान्य होत नाही तोपर्यंत शेतकरी होकार देणार नाहीत. मग आपण भू–संपादन कराल आणि शेतकरी इन्सेन्टिव्ह आणि भू–भाडे या दोन्ही गोष्टींना मुकेल. म्हणून धरणग्रस्त शेतकऱ्यांनी निवेदन देत, भू–भाड्याचा प्रश्न निकाली लागेपर्यंत स्वेच्छा भू–संपादनाची तारीख वाढवावी, अशी मागणी केली आहे.

# हिरवळ महाविद्यालय महाड येथे शिवजयंती उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

विद्यार्थी परिषद, हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाडतर्फे तिथीनुसार शिवजयंती उत्सवाचे आयोजन विद्यार्थी परिषद करण्यात आली होती.

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी हिंदवी स्वराज्याची राजधानी किल्ले रायगडवरून ज्योत आणून कार्यक्रमाचा शुभारंभ केला. छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये असलेली महाराजांची प्रतिमा तसेच विद्यार्थ्यांनी आणलेली ज्योत व छत्रपती शिवाजी महाराजांची पालखी यांचे पूजन करून खालुबाजा आणि लेझिमच्या तालात कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.

पालखीचा मार्ग छत्रपती शिवाजी चौक– भगवानदास बेकरी–जुना पोस्ट– नवेनगर –महाड बस डेपो, चांभारखिंड ते महाविद्यालय असा होता. कार्यक्रम स्थळी पालखीचे आगमन झाल्यावर प्रमुख पाहुणे संतोष बुटाला, सेक्रेटरी हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट, सुदेश कदम, प्राचार्य सिनिअर कॉलेज हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट, राकेश वडवळकर, प्राचार्य हिरवळ रात्र महाविद्यालय, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या विद्या गुजर उपस्थित होते.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पाळणा गीत, पोवाडा व महाराजांच्या कार्याबद्दल माहितीपर भाषणे सादर केली. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी युवा व्याख्याते शुभम राहीलकर यांचे स्वागत करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना महाराजांचे कार्य व आताची पिढी यावर व्याख्यान दिले. कार्यक्रमाची सांगता छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा व हस्ताक्षर स्पर्धा यांचे बक्षीस वितरण व अल्पोपहार यांनी करण्यात आला.

कॉलेजचे अध्यक्ष किशोर धारिया आणि संचालिका सोनाली धारिया यांच्या प्रोत्साहनाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती सोहळ्याचे आयोजन महाविद्यालयाच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कॉलेजचे प्राचार्य सुदेश कदम यांनी विद्यार्थ्यांना उत्स्फूर्त प्रतिसादाकरिता प्रोत्साहन दिले, तसेच या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी पारंपरिक पोशाखात उपस्थित होते.

# बेली आदिवासीवाडी अंगणवाडीसाठी ११ लाख २५ हजारांचा निधी मंजूर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील बेली आदिवासीवाडी अंगणवाडीसाठी जिल्हा नियोजन समितीमधून ११ लाख २५ हजार रकमेची नवीन अंगणवाडी मंजूर करण्यात आली आहे.

उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील बेलीवाडी आदिवासी वाडीवर अंगणवाडी अस्तित्वात नसल्याने या ठिकाणी अंगणवाडीसेविका २०१०पासून जिल्हा परिषद शाळेच्या किचन रूममध्ये ० ते सहा वयोगटातील २७ बालकांना शिक्षणाचे धडे देत होती. शिक्षण देत असताना बालकांसाठी बैठकीची सुसज्ज व्यवस्था नव्हती. रुमची अवस्था कोंडवाड्याप्रमाणे होती. शिक्षण घेत असताना बालकांना खूप अडचणीला सामोरे जावे लागत होते. ही व्यथा आदिवासी समाजबांधवांनी व ग्रीन वर्कस् ट्रस्ट गार्गी गीध यांच्याकडे व आमच्या प्रतिनिधीनीकडे मांडल्यानंतर त्या संदर्भातील वृत्त प्रसिद्ध होताच त्याची संबंधितांनी दखल घेऊन जिल्हा नियोजन समिती निधीतून ११ लाख रुपये २५ हजार रकमेची नवीन अंगणवाडी मंजूर करण्याकरिता प्रयत्न केले.

# पालीतील मुख्य जलवाहिनीला गळती

## ▪ नगरपंचायतीचे दुर्लक्ष; हजारो लिटर पाण्याचा अपव्यय



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पालीकरांना पाणी पुरवठा करणाऱ्या जॅकवेलजवळ असलेल्या मुख्य जलवाहिनीला मोठी गळती लागल्याने दररोज हजारो लिटर पाण्याचा अपव्यय होत आहे. या गळतीकडे पाली नगरपंचायत दुर्लक्ष करीत असल्याचे सध्या चित्र दिसत आहे.

पालीकरांना अंबा नदीतून पाणीपुरवठा करण्यात येतो. अंबा नदीजवळील जॅकवेलमधून पंपांद्वारे पाणी सरसगडाच्या पायथ्याशी असलेल्या साठवण टाक्यांमध्ये सोडले जाते व तेथून पाली नगरपंचायत हद्दीत पाणीपुरवठा केला जातो. जॅकवेलजवळ मुख्य जलवाहिनीलाच गळती लागल्याने कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. सतत तक्रारी करूनदेखील उपाययोजना होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पाणीपुरवठा योजनेच्याच बाजूला अंबा नदीवर नवीन पुलाचे बांधकाम सुरू आहे. हे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने सदर जलवाहिनीचे काम करण्यास अडथळा होत असल्याचे कारण दिले जाते, पण प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनाचा भुर्दंड पालीकरांच्या माथी का? असाही सवाल जनतेकडून केला जात आहे. इतके होऊनही नगरपंचायत ही पाण्याची गळती थांबवणार की, बघ्याची भूमिका घेणार? असा सवाल विचारला जात आहे.

**फुटलेली जलवाहिनी ताबडतोब दुरूस्ती करून लवकरच त्या पूर्ववत केल्या जातील, तसेच लवकरच नवीन जलवाहिनीचे कामही हाती घेण्यात येणार आहे.**
**–विद्या येरुणकर, मुख्याधिकारी, पाली नगरपंचायत**

# रोहा नगरपरिषद उर्दू शाळेतर्फे महिलांचा सत्कार

## या शाळेतील विद्यार्थी भविष्यात देश पातळीवर यश संपादन करतील -डॉ. धीरज चव्हाण

**धाटाव : प्रतिनिधी**

उर्दू शाळेतील शिक्षक ज्या आत्मियतेने विद्यार्थ्यांना शिक्षण देतात शिकवतात. त्या आत्मीयतेने या शाळेतून भविष्यात देश पातळीवर नाव घेऊन जाणारे विद्यार्थी घडतील, असा विश्वास मुख्याधिकारी डॉ. धीरज चव्हाण यांनी व्यक्त केला.



रोहा नगरपरिषद उर्दू शाळेतर्फे मुख्याध्यापक गजनफर हसन क्लाब यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी मुख्याधिकारी डॉ. चव्हाण बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, रोहा शहराला शैक्षणिक इतिहासाची एक मोठी पार्श्वभूमी आहे. स्वतंत्र भारताचे पहिले आरबीआयचे गव्हर्नर, अर्थमंत्री आदरणीय चिंतामणराव देशमुख यांचे हे गाव आहे. या शहराला शिक्षणाच्या बाबतीत असलेला पार्श्वभूमी येत्या काळात निश्चितपणे महिला पुढे येतील. यासाठी शाळेतील सर्व पदाधिकारी, प्रशासनाचे जे अधिकारी येतील तेही परंपरा चालू ठेवतील, पण महिलांच्या शिक्षणाच्या बाबतीत फक्त आपण कार्यक्रम करणे किंवा सर्वांनी बोलून उपयोग नाही समाजामध्येसुद्धा हा विकास घडला पाहिजे. दहावीनंतर विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबिर घेतले जावे. त्यासाठी सहकार्य करण्याचे अभिवचन डॉ. चव्हाण यांनी या वेळी दिले.

या वेळी अहमद दर्जी, वरचा मोहल्ला मुस्लिम कमिटी माजी अध्यक्ष महमद डबीर, शाळा व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष अलिम मुमेरे, उपाध्यक्ष अखलाक नाडकर, हमीद नुराजी, इकबाल अन्वारे, मजीद वलविले, इम्तियाज नाडकर, बिलाल मोर्बेकर सर्व शिक्षक, पालकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महमद डबीर व अखलाक नाडकर यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात डॉ. आमीना घरटकर, डॉ. रुही बोधले, डॉ. सारा अनवारे, डॉ. सुमैरा परदेशी, डॉ. हूमैरा चोगले, डॉ. सामीया सवाल, डॉ. तसबीना कासकर, ॲड. अजमा कुरेशी, पत्रकार अंजूम शेटे, सालेहा नुराजी, तहूरा तुळवे, रेशमा कर्जीकर आदींना मुख्याधिकारी डॉ. धीरज चव्हाण यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी जुन्या काळात महिलांवर होणारे आत्याचार, महिलांच्या शिक्षणाबाबत सावित्रीबाई फुले, फतिमा शेख यांनी त्या काळात मुलींच्या शिक्षणासाठी जे प्रयत्नशील केले, त्याविषयी नृत्याद्वारे अतिशय उत्तम सादरीकरण करत उपस्थित मान्यवरांची मने जिंकली. सुत्रसंचालन सबा करानी व रफत खान, प्रास्ताविक अखलाक नाडकर यांनी केले. आभार मुख्याध्यापक गजनफर हसन क्लाब यांनी मानले.

# अलिबाग बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. प्रसाद पाटील

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. प्रसाद पाटील तर उपाध्यक्षपदी ॲड. अनंत पाटील निवडून आले. खजिनदारपदी ॲड. राजेंद्र माळी आणि सहसचिव पदावर ॲड. निकेत चवरकर निवडून आले आहेत. सचिवपदी ॲड. अमित देशमुख आणि अंतर्गत हिशोब तपासणीसपदी ॲड. समाधान पाटील हे बिनविरोध निवडून आले होते.



सात वर्षांनी अलिबाग बार असोसिएशन निवडणूक झाली. मंगळवारी (दि. १४) मतदान झाले. एकूण ४६४ मतदारांपैकी ४३७ जणांनी आपला हक्क बजावला. माजी जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रसाद पाटील आणि अलिबाग बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रविण ठाकूर यांच्या पॅनलमध्ये लढत होती. अध्यक्षपदासाठी ॲड. प्रसाद पाटील आणि ॲड. प्रविण ठाकूर या दोन तुल्यबळ उमेदवारांमध्ये लढत होती. त्यामुळे या निवडणुकीच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ॲड. प्रसाद पाटील यांनी ॲड. प्रविण ठाकूर यांचा पराभव केला.

अध्यक्षपदी ॲड. प्रसाद पाटील यांना २३६ तर ॲड. प्रविण ठाकूर यांना १९८ मते मिळाली. उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत ॲड. अनंत पाटील यांनी ॲड. मानसी म्हात्रे यांचा पराभव केला. खजिनदारपदी ॲड. राजेंद्र माळी आणि सहसचिवपदावर ॲड. निकेत चवरकर निवडून आले.

दोन महिला सदस्यांच्या जागांसाठी तीन उमेदवार रिंगणात होत्या. यामध्ये ॲड. प्रविण ठाकूर पॅनलच्या ॲड. मंजिरी सावंत आणि ॲड. पूजा पाटील निवडून आल्या. पुरुष सदस्यपदाच्या तीन जागांसाठी ११ उमेदवार रिंगणात होते. यात ॲड. प्रसाद पाटील यांच्या पॅनलचे ॲड.अझहर घट्टे आणि ॲड. पंकज पाटील विजयी झाले. एका जागेवर ॲड. प्रविण ठाकूर पॅनलचे ॲड. कौस्तुभ पूनकर निवडून आले.

# मुंबईची प्ले ऑफमध्ये धडक

## सलग पाचवा विजय; गुजरातवर मात

**मुंबई : प्रतिनिधी**

महिला प्रीमियर लीगमध्ये (डब्ल्यूपीएल) मंगळवारी झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा सामना गुजरात जायंट्सशी झाला. हरमनप्रीतची अर्धशतकी खेळी तसेच गोलंदाजीच्या जोरावर मुंबईने सलग पाचवा विजय नोंदवला आणि गुजरातवर ५५ धावांनी मात केली. यासोबतच प्ले ऑफमध्ये धडक दिली आहे



मुंबई इंडियन्सने गुजरात जायंट्ससमोर १६३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना मुंबईने २० षटकांत आठ गडी गमावून १६२ धावा केल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरने ३० चेंडूंत ५१ धावांची धडाकेबाज खेळी केली. यास्तिका भाटियाने ४४ धावा केल्या. प्रथम फलंदाजी करताना मुंबईची सुरुवात चांगली झाली नाही. इनफॉर्म फलंदाज हेली मॅथ्यूजला डावाच्या पहिल्या ओव्हरच्या चौथ्या चेंडूवर ॲशले गार्डनरने बाद केले. यानंतर नॅट सीवर ब्रंट आणि यास्तिका भाटिया यांनी दुसऱ्या विकेटसाठी ७४ धावांची भागीदारी केली. नेट सीव्हर ३१ चेंडूंत पाच चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ३६ धावा करून बाद झाली.

यास्तिका भाटियाचे अर्धशतक हुकले आणि ३७ चेंडूत पाच चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ४४ धावा केल्यानंतर ती धावबाद झाली. यानंतर हरमनप्रीत कौर आणि अमेलिया केर यांनी चौथ्या विकेटसाठी ५१ धावांची भागीदारी केली. अमेलिया १९ धावा करून बाद झाली. त्याचवेळी इसाई वँगला खातेही उघडता आले नाही. कर्णधार हरमनप्रीत कौरने झंझावाती अर्धशतक ठोकले, पण अर्धशतकानंतर तिने तिची विकेट गमावली. हरमनप्रीतला गार्डनरने हरलीन देओलच्या हाती झेलबाद केले. गुजरातकडून ॲश्ले गार्डनरने तीन बळी घेतले, तर किम गर्थ, स्नेह राणा आणि तनुजा यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

गुजरात संघाला निर्धारित २० षटकांमध्ये नऊ बाद १०७ धावाच करता आल्या. मुंबईने आपले पाचही सामने जिंकत अव्वल स्थान कायम राखले असून त्यांचे पाच सामन्यांत १० गुण झाले आहेत. त्याचबरोबर गुजरातचा संघ पाचपैकी एक सामना जिंकून चौथ्या स्थानावर आहे. प्ले ऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी गुजरातला विजय आवश्यक होता, मात्र त्यांच्या पदरी निराशा पडली. आता सर्व सामने जिंकणे आवश्यक आहेत.

# 'झुंझार' क्रिकेट स्पर्धेत प्रतीक क्रिकेट अकॅडमी विजयी

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित कै. ॲड. शिरीष पाटील स्मृतीचषक एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेतल्या साखळी सामन्यात प्रतीक क्रिकेट अकॅडमी पनवेल संघांनी स्पोर्टींगो क्रिकेट अकॅडमी कळंबोली संघावर ४३ धावांनी विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यासाठी पात्रता मिळवली आहे.



प्रथम नाणेफेक जिंकून फलंदाजी स्वीकारलेल्या पनवेल संघांनी ४० षटकांच्या समाप्तीनंतर २१३ धावा धावफलकावर नोंदवल्या. सलामीचा फलंदाज आर्य म्हात्रेने २३, ईशान पाठक ३० व पार्थ पवार यांनी ३० धावांचे योगदान देत संघाची धावसंख्या २१३पर्यंत पोचवली, स्पोर्टीगोकडून श्रेयस पवार यांनी तीन, दिव्यांश चौधरी व सानुराग शर्मा यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. प्रत्युत्तरात स्पोर्टींगो संघाकडून युवराज खिल्लारे यांनी सर्वाधिक २९ धावा काढल्या. पनवेल कडून तनिषा शर्मा हिने सुरेख गोलंदाजी करीत चार षटकांमध्ये अवघ्या ११ धावा देत चार फलंदाज बाद केले. तिला दुसऱ्या बाजूने जाईद खान याने साथ देत दोन गडी बाद केले. स्पोर्टींगो संघांनी सर्व गडी गमावत १७० धावा केल्या. पनवेल संघांनी सामना ४३ धावांनी जिंकला.

उत्कृष्ठ गोलंदाजी करणाऱ्या तनिषा शर्मा हिला सामनावीर, युवराज खिल्लारे स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू तर आर्यन जाधव ह्याला उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या निवड समितीचे सदस्य, प्रसिद्ध जलदगती गोलंदाज अरुण तारे, अजय टेमकर,किरण चौधरी, विरेंद्र पाठक, नरेंद्र शर्मा, किशोर गोसावी, प्रकाश देसाई, प्रतीक मोहिते, योगेश खंडाळे, संकेश ढोळे, आदेश नाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# रजनीची आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

तुर्भे नाका आंबेडकर नगर येथील रहिवासी रजनी गुप्ता हिची निवड नेपाळ येथे मे २०२३मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी झाली आहे. याबद्दल आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते तिचा सन्मान करण्यात आला. पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

या वेळी माजी नगरसेवक अमित मेढकर, मुनावर पटेल, समाजसेवक अंकुश मेढकर, समाजसेवक अमर मेढकर, शानू ढामळे आदी उपस्थित होते.

तुर्भेसारख्या झोपडपट्टी परिसरामध्ये राहून रजनी गुप्ताने कराटे खेळामध्ये घवघवीत यश मिळवले आहे. यापूर्वी झालेल्या राष्ट्रीय आणि विभागीय स्पर्धांमधून तिने सुवर्णपदक पटकावले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्येदेखील तिला सुवर्णपदक मिळेल अशा शुभेच्छा आमदार नाईक यांनी तिला दिल्या. आपल्या आतापर्यंतच्या वाटचालीमध्ये माझे प्रशिक्षक, आई-वडिलांचे खूप सहकार्य मिळाले, अशी प्रतिक्रिया रजनी गुप्ता हिने दिली.

## मनिकाच्या पराभवासह भारतीयांचे आव्हान संपुष्टात

**सिंगापूर : वृत्तसंस्था**

भारतीय टेबल टेनिसपटूंनी निराशाजनक कामगिरी केली. मनिका बत्रा हिला महिला दुहेरी व मिश्र दुहेरी या दोन्ही विभागांत पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे भारतीयांचे सिंगापूर स्मॅश टेबल टेनिस स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

हिना हयाता-तोमोकाझू हरीमोतो या जपानच्या खेळाडूंनी मनिका बत्रा- जी. साथियन या भारतीय जोडीवर ११-९, ११-९, ८-११, ५-११, ११-७ असा विजय साकारला. जागतिक स्पर्धेमध्ये हिना व हरीमोतो या जोडीने रौप्यपदक पटकावले होते, पण चौथ्या मानांकित या जोडीला भारतीय जोडीने कडवी झुंज दिली हे विशेष.

# बांगलादेशची ऐतिहासिक कामगिरी

## टी-२० मालिकेत इंग्लंडला क्लीन स्वीप

**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेश आणि इंग्लंड यांच्यात खेळल्या गेलेल्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत यजमान बांगलादेशने तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत विश्वविजेत्या इंग्लंड क्रिकेट संघाचा ३-०असा पराभव करून इतिहास रचला आहे. मीरपूर येथे झालेल्या तिसऱ्या टी-२०मध्ये बांगलादेशने इंग्लंडचा १६ धावांनी पराभव करीत क्लीन स्वीप केला.




मंगळवारी झालेल्या तिसऱ्या टी-२० सामन्यात बांगलादेशने प्रथम फलंदाजी करताना, लिटन दासच्या ७३ धावा आणि नजमुल शांतोच्या ४७ धावांच्या जोरावर २० षटकांत दोन गडी गमावून १५८ धावा केल्या. यादरम्यान इंग्लंड क्रिकेट संघासाठी सात खेळाडूंनी गोलंदाजी केली, परंतु केवळ आदिल रशीद आणि ख्रिस जॉर्डन यांना १-१ विकेट मिळाली.

प्रत्युत्तरात इंग्लंड संघाचा सलामीवीर डेव्हिड मलानने ५३ धावांची खेळी खेळून संघाला चांगली सुरुवात करून दिली, पण फिल सॉल्ट भोपळाही न फोडता बाद झाला. त्याच वेळी जोस बटलरने ३१ चेंडूत ४० धावांची खेळी करीत संघाच्या आशा जिवंत ठेवल्या, पण तस्किन अहमदच्या किफायतशीर गोलंदाजीनंतर मुस्तफिझूर आणि शाकीबने इंग्लंडला २० षटकांत सहा बाद १४२ धावांवर रोखले. त्यामुळे इंग्लंडला १६ धावांनी पराभव पत्करावा लागला.

बांगलादेशकडून तस्किन अहमदने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या, तर तन्वीर इस्लाम, शाकिब अल हसन आणि मुस्तफिजुर रहमान यांनी १-१ विकेट घेतली. यासह बांगलादेशने तीन सामन्यांची टी-२० मालिका ३-०ने जिंकली.

नजमुल हुसेन शांतोला त्याच्या शानदार कामगिरीसाठी मालिकावीर पुरस्कार देण्यात आला. त्याचबरोबर आजच्या सामन्यासाठी लिटन दासला सामनावीर पुरस्कार देण्यात आला.

## छत्रपती शिवाजी महाराज कबड्डी स्पर्धा

# पुणे, मुंबई शहर चषकाचे मानकरी

**जळगांव : प्रतिनिधी**

जळगांव येथील सागर पार्क मैदानातील मॅटवर झालेल्या महिलांच्या अंतिम सामन्यात पुण्याने मुंबई उपनगरचा प्रतिकार ३७-२८ असा मोडून काढत रोख एक लाख ५० हजार रु. व छत्रपती शिवाजी महाराज चषक आपल्या नावे केला. उपविजेत्या उपनगरला चषक व रोख एक लाख रु. वर समाधान मानावे लागले.








पहिल्या डावात लोन देत २०-१६ अशी आघाडी घेणाऱ्या पुण्याने दुसऱ्या डावात आणखी एक लोण देत नऊ गुणांच्या फरकाने आपला विजय साकारला. निकिता पडवळ, आम्रपाली गलांडे यांच्या संयमी चढाया, त्याला साक्षी गावडे, पूजा शेलार यांनी उत्कृष्ट पकडी करीत दिलेली मोलाची साथ यामुळे पुण्याला हे शक्य झाले. उपनगरच्या हरजित कौर संधू हिला अन्य खेळाडूंची म्हणावी तशी साथ मिळाली नाही. त्यांच्या शुभदा खोत, प्रणाली नागदेवता यांचा या सामन्यात प्रभाव पडला नाही.

पुरुषांच्या अंतिम सामन्यात मुंबई शहरने अहमदनगरचे आव्हान २८-२५ असे परतवून लावत छत्रपती शिवाजी महाराज चषक व रोख रु. एक लाख ५० हजार रु. आपल्या खात्यात जमा केले. उपविजेत्या अहमदनगरला चषक व रोख एक लाख रु. वर समाधान मानावे लागले. मुंबईने नाणेफेक जिंकत मैदानाची निवड केली. नगरने आक्रमक सुरुवात करीत पहिल्या काही मिनिटांत आघाडी घेतली, पण त्याने विचलित न होता मुंबईने पहिल्या सत्रातच दोन लोन नोंदवित २१-८ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या सत्रात मात्र बेसावध रहाणाऱ्या मुंबईवर नगरने एक लोन देत आपली आघाडी कमी केली. पुन्हा काही गुण घेत आघाडी एका गुणापर्यंत खाली आणली. नंतर मात्र अतिशय संयमाने खेळ करीत तीन गुणांनी मुंबईने विजेतेपदाचा चषक उंचावला.

# ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धेत प्रणोय, लक्ष्य सेन विजयी

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय बॅडमिंटनपटूंनी ऑल इंग्लंड बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेची सुरुवात शानदार केली. एच. एस. प्रणॉय व लक्ष्य सेन या दोन्ही अनुभवी खेळाडूंनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करीत प्रतिष्ठेच्या स्पर्धेची दुसरी फेरी गाठली.





भारताचा प्रणॉय व चीन तैपईचा झू वँग यांच्यामध्ये अटीतटीची लढत झाली. पहिल्या गेममध्ये प्रणॉयने सलग पाच गुण जिंकत आपले इरादे स्पष्ट केले. त्यामुळे प्रणॉयकडे ११-४ अशी आघाडी होती, पण त्यानंतर बॅडमिंटन कोर्टवर चूक झाल्यामुळे प्रतिस्पर्ध्याला ११-१४ अशी आघाडी कमी करता आली. प्रणॉयने पुन्हा झोकात पुनरागमन करीत सलग चार गुण मिळवले. वँग याने प्रणॉयच्या तोडीसतोड खेळ करीत १९-१९ अशी बरोबरी साधली. प्रणॉयने दबावाखाली आपला खेळ उंचावला आणि दमदार स्मॅशच्या जोरावर पहिला गेम २१-१९ असा जिंकला.

वँगने दुसऱ्या गेमची सुरुवात जबरदस्त केली. त्याच्याकडे ७-२अशी आघाडी होती. प्रणॉयने आपल्या खेळाचा दर्जा उंचावत बरोबरी साधली. ब्रेकनंतर प्रणॉयकडे १९-१७ अशी आघाडी होती. वँगने हार न मानता १९-१९ अशी बरोबरी करीत लढतीतील आव्हान कायम ठेवले. हा दुसरा गेम २२-२० असा जिंकला. प्रणॉय याने वँगवर पाच सामन्यांत विजय मिळवले आहेत.

## युवा खेळाडूंनी देशाचे नाव उज्ज्वल करावे-मंत्री गिरीश महाजन



**मुंबई : प्रतिनिधी**

जर्मनी येथे प्रशिक्षणासाठी निवडल्या गेलेल्या विद्यार्थ्यांनी देशाचे नाव उज्ज्वल करावे अशा शुभेच्छा क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन यांनी दिल्या. मुंबई येथे एमसीए क्लब येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

जागतिक दर्जाचे खेळाडू तयार व्हावेत यासाठी महाराष्ट्र शासन आणि एफसी बायर्न महाराष्ट्र फुटबॉल क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचा महासंकल्प : मिशन वर्ल्ड कप हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. राज्यातील ३६ जिल्ह्यांमधून स्पर्धा घेण्यात आल्या. यामधून २० विद्यार्थी निवडले गेले. आता ही मुले एप्रिलमध्ये जर्मनी येथे खेळाचे प्रशिक्षण घ्यायला जाणार आहे.

जर्मनीचे भारतातील वाणिज्य दूत किम वुथ यांनी राज्याच्या पुढाकाराबद्दल कौतुक केले. विद्यार्थ्यांचे क्रीडा कौशल्य बघून प्रभावित झालो असल्याचे सांगून विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com